sayanupdate@gmail.com 8055620155 RNI NO. : MAHMAR/2022/82698

सुविचार

तन्मयता नसेल तर विद्वत्ता व्यर्थ आहे.


दैनिक DAINIK SAYAN UPDATE

# सायं अपडेट

■ वर्ष ३ रे ■ अंक २२३ ■ शनिवार १४ डिसेंबर २०२४ ■ मराठी ■ सायं दैनिक ■ सोलापूर ■ पाने : ८ ■ किंमत ३ रुपये

■Vol 3 ■ Issue no 223 ■ Saturday 14 December 2024 ■ Marathi ■ Evening Daily ■ Solapur ■ Page : 8 ■ Price : Rs. 3/-


# मंत्रिमंडळ विस्तारासंदर्भातील अंतिम यादीवर दिल्लीत शिक्कामोर्तब

## १९९१ नंतर प्रथमच नागपुरात उद्या शपथविधी

मुंबई, दि. १४- महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचा उद्या (रविवारी) नागपूरमध्ये विस्तार होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार शपथ घेतल्यानंतर दहा दिवसांनी राज्यातल्या मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे. १९९१ नंतर प्रथमच नागपुरात मंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. उद्या दुपारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे नवीन मंत्र्यांना पद व गोपनीयतेची शपथ देतील. महायुतीच्या मंत्रिमंडळात भाजपचे २१, शिवसेनेचे १२, राष्ट्रवादीचे १० मंत्री असणार आहे, अशी सूत्रांची माहिती आहे.

अशातच महायुतीच्या मंत्रिमंडळाची यादी संदर्भात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मंत्रिमंडळ विस्तारासंदर्भातली



नावांची यादी आता दिल्ली दरबारी गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता केवळ औपचारिकता असली तरी दुपारपर्यंत या यादीवर अंतिम शिक्कामोर्तब होणार असल्याची माहिती पुढे आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी एकत्रित यादी दिल्लीत पाठवल्याची माहिती सूत्रांकडून मिळते आहे. तर दुपारनंतर मंत्रिपदावर वर्णी लागणाऱ्यांना संपर्क सुरु होणार असल्याचे देखील सांगण्यात येत आहे.

**शपथविधी सोहळ्याच्या तयारीला वेग**

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार आणि नव्या मंत्र्यांचा शपथविधी सोहळा उद्या (रविवारी) नागपुरातील राजभवनात होणार आहे. मात्र, मंत्रिमंडळ विस्तारात भाजप आणि शिवसेना हे दोन पक्ष त्यांच्या कोट्यातील काही मंत्रिपद रिक्त ठेवू शकतात अशी शक्यता आहे. दोन्ही पक्षात मंत्रिपदासाठी इच्छुकांची संख्या जास्त असल्यामुळे दोन्ही पक्षांकडून काही मंत्रिपद रिक्त ठेवले जाऊ शकतात, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

**शपथविधी सोहळा राजभवनातील लॉनवर?**

दरम्यान राजभवनात मंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी तयारीला सुरुवात झाली आहे. उद्या (रविवारी) संध्याकाळी चार वाजता हा शपथविधी सोहळा राजभवनातील लॉनवर होण्याची शक्यता आहे. एवढ्या मोठ्या संख्येने मंत्र्यांच्या शपथविधीसाठी राजभवनात तेवढ्या क्षमतेचा सभागृह नाही, त्यामुळे राजभवनाच्या लॉनवर शपथविधी सोहळा होऊ शकेल अशी शक्यता आहे.



सोलापूर : श्री दत्त जयंतीनिमित्त दंडवते महाराज मठात पाळण्याचा कार्यक्रम पार पडला.

## अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज मंदिरात श्री दत्त जयंती उत्साहात साजरी

अक्कलकोट , दि. १४-अक्कलकोट निवासी दत्तावतारी श्री स्वामी समर्थ महाराजांचे मूळ स्थान असलेल्या श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात आज (शनिवार) श्री दत्त जयंती उत्सव अपार श्रद्धेने व मोठ्या भक्तिभावात साजरा झाला. या निमित्ताने लाखो भक्तांनी श्रींचे दर्शन घेतले.

पहाटे पाच वाजता मंगलमय वातावरणात देवस्थानचे पुरोहित मोहन महाराज पुजारी यांच्या अधिपत्याखाली व्यंकटेश पुजारी यांच्या हस्ते देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या उपस्थितीत श्रींची काकड आरती झाली. त्यानंतर स्वामी भक्तांना दर्शनाकरिता मंदिर खुले करण्यात आले. सकाळी साडेअकरा वाजता नैवेद्य आरती भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. दत्त जयंती निमित्त राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या पालख्या दिंडी पदयात्रा अक्कलकोट निवासी विसावल्या. यामध्ये रत्नागिरी, भांडुप, मुंबई, सातारा, बार्शी, सोलापूर, कोल्हापूरसह राज्यातील विविध जिल्ह्यातून पालखी आल्या होत्या.

## राज्यपाल निघाले नागपूरकडे

नागपूर, दि.१४- राजेंद्र उट्टलवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती राज्य सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार शपथविधी रविवारी १५ डिसेंबर रोजी दुपारी चार वाजता नागपुरातील राजभवनात होत आहे. या सोहळ्यासाठी स्थानिक प्रशासन जोमाने कामाला लागले असून केवळ निमंत्रितांसाठी हा सोहळा असणार आहे. अजूनही इच्छुकांना फोन न आल्याने समर्थकांमध्ये अस्वस्थता आहे. दुसरीकडे राजभवन सज्ज होत असून राज्यपाल सी. राधाकृष्णन नागपूरच्या दिशेने मुंबईवरून निघाले आहेत.

## महाराष्ट्रात थंडीचा जोर कायम राहणार

पुणे, दि. १४- राज्यात सध्या सर्वत्र कडाक्याची थंडी पाहायला मिळत आहे. उत्तरेकडे थंड वाऱ्याचा प्रवाह वाढल्याने राज्यातील बहुतांश भागात गारठा वाढला आहे. काही भागात तापमान शून्य अंशाच्या खाली गेले आहे. तसेच दक्षिण पश्चिम बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात नाशिक, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या भागात थंडीचा जोर वाढला आहे. तसेच पुढील काही दिवस महाराष्ट्रात थंडीचा जोर कायम राहणार आहे.

सध्या पुण्यातील किमान तापमानात वाढ झाली आहे. मात्र, थंडी कायम राहणार आहे. उत्तरेकडील राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढल्याने यंदाच्या हंगामात सपाट भूभागावर प्रथमच शून्य अंशाच्या खाली घसरला आहे. राज्यातही गारठा कायम असून धुळे येथील कृषी महाविद्यालयात राज्यात निचांकी ६ अंश तापमानाची नोंद करण्यात आली आहे. यामुळे राज्यात गारठा कायम राहणार असला, तरी किमान तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

## भाजपचे ज्येष्ठ नेते अडवाणी रुग्णालयात दाखल

नवी दिल्ली, दि. १४- भारतीय जनता पक्षाचे (भाजप) ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी (वय ९७) यांची प्रकृती पुन्हा एकदा अचानक बिघडली आहे. त्यांना दिल्लीतील अपोलो रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. लालकृष्ण अडवाणी गेल्या काही दिवसांपासून अस्वस्थ होते. लालकृष्ण अडवाणी यांना गेल्या चार ते पाच महिन्यांत चौथ्यांदा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापूर्वी ऑगस्ट महिन्यात त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

## सावरकरांनी संविधानापेक्षा मनुस्मृतीला वरचे स्थान दिले : राहुल गांधी



नवी दिल्ली, दि. १४- संसदेत संविधानावर चर्चा सुरु आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी बोलत आहेत. संविधानावर चर्चा करताना राहुल गांधी यांनी अभय मुद्रेचा उल्लेख केला. आपले संविधान विचारांचा एक समूह आहे. संविधान एक जीवन दर्शन आहे. संविधान आमचा एका सांस्कृतिक विचार आहे. संविधानात प्राचीन वारसा सामावलेला आहे, असे खासदार राहुल गांधी म्हणाले. आरएसएसने मनुस्मृतीला संविधानापेक्षा चांगले ठरवल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला. सावरकरांनी सुद्धा संविधानापेक्षा मनुस्मृतीला वरचे स्थान दिले होते, असे राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी म्हणाले की, संविधानात आम्हाला बाबासाहेबांचे आदर्श दिसतात.

राहुल गांधींनी आपल्या भाषणात द्रोणाचार्य आणि एकलव्य यांचाही उल्लेख केला. जसा द्रोणाचार्यांनी एकलव्याचा अंगठा मागितला, तसे तुम्ही हिंदुस्तानच्या युवकांचा अंगठा कापत आहात. देशातील सर्व उद्योग अदानीला दिले जात आहेत.

देशातील उद्योगपतींचा अंगठा कापला जात आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. भाजपला देशाची ताकद हिसकावायची आहे. शेतकऱ्यांऐवजी अंबानी, अदानी यांना फायदा पोहोचवला जातोय. पेपरलीक सारख्या प्रकरणात युवकांचा अंगठा जातोय, असं राहुल गांधी म्हणाले.

### एका धर्माला दुसऱ्या धर्माशी भांडायला लावतात

राहुल गांधींनी आपल्या भाषणात हाथरसचा मुद्दा उचलला. आरोपी बाहेर फिरतायत आणि पीडित कुटुंब घरात बंद आहे. पीडित कुटुंबाला मुलीचे अंत्यसंस्कार करु दिले नाहीत, असं राहुल गांधी म्हणाले. मी हाथरसच्या पीडित कुटुंबाला भेटलो आहे. सीएम हाथरस घटनेबद्दल खोटे बोलले. आरोपी पीडित परिवाराला धमकावतात. कारण यूपीमध्ये संविधान नाही, मनुस्मृती लागू आहे, असे राहुल गांधी म्हणाले. भाजपवाले संविधानावर हल्ला करतात. त्यांनी संभलचा मुद्दा सुद्धा उचलला. संभलमध्ये पाच जणांची हत्या करण्यात आली, असं राहुल गांधी म्हणाले. भाजपचे लोक एका धर्माला दुसऱ्या धर्माशी भांडायला लावतात हे कुठे संविधानात लिहिले आहे? आमची आणि इंडिया आघाडीची देशात संविधान स्थापन करण्याची विचारधारा आहे, असं राहुल गांधी म्हणाले.

## पावसाचा खेळ; बदलली सामन्याची वेळ!

### पहिल्या दिवसाच्या खेळात ८० चेंडूचा खेळ, ऑस्ट्रेलियाने केल्या बिनबाद २८ धावा

ब्रिस्बेन, दि. १४- भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील गाबा कसोटी सामन्यातील पहिल्या दिवसाच्या खेळावर पावसाने पाणी फेरले. रोहित शर्माने नाणेफेक जिंकून ढगाळ वातावरणात पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण पहिल्या दिवशी केवळ १३.२ षटकांचा खेळ झाला. ऑस्ट्रेलियन सलामीवर नॅथन मॅकस्विनी आणि उस्मान ख्वाजा यांनी नव्या चेंडूवर संयमी खेळी केल्याचे पाहायला मिळाले.



विकेट न मिळाल्यामुळे भारतीय संघाचा पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा डाव थोडा फसलाच, असे म्हणावे लागेल. पावसाच्या व्यत्ययामुळे पहिल्या दिवसाचा खेळ थांबवण्यात आला त्यावेळी ऑस्ट्रेलियन संघाने धावफलकावर २८ धावा लावल्या होत्या. नॅथन मॅकस्विनी ३३ चेंडूचा सामना करून ४ धावांवर तर उस्मान ख्वाजा ४७ चेंडूत १९ धावांवर खेळत होते. पहिल्या दिवसाचा बहुताश खेळ पाण्यात गेल्यामुळे याची भरपाई करण्यासाठी आता उर्वरित चार दिवसांच्या खेळात प्रत्येक दिवशी ९८ षटकांचा खेळ होणार आहे.

**पावसाच्या बॅटिंगमुळे बदलली वेळ!**

पहिल्या दिवसाचा खेळ हा भारतीय प्रमाण वेळेनुसार पहाटे ५ वाजून ५० मिनिटांनी सुरु झाला होता. आता दुसऱ्या दिवशीपासून अधिक षटकांचा खेळ व्हावा, यासाठी सकाळी ५ वाजून २० मिनिटांनीची सामन्याला सुरुवात होईल. अखेरच्या सत्रातील शेवटचा चेंडू टाकण्याची वेळ ही दुपारी १२ वाजून ५० मिनिटे अशी करण्यात आली असून हा वेळही अर्धा तास वाढवला जाऊ शकतो.

**दिवसभरातील तीन सत्रातील वेळापत्रक**

* पहिले सत्र- सकाळी ५ वाजून २० मिनिटे ते सकाळी ७ वाजून ५० मिनिटे
* दुसरे सत्र- सकाळी ८ वाजून ३० मिनिटे ते सकाळी १० वाजून ३० मिनिटे
* तिसरे सत्र- सकाळी १० वाजून ५० मिनिटे ते दुपारी १२ वाजून ५० मिनिटे.

(दिवसभरातील नियोजित ९८ षटकांचा कोटा पूर्ण झाला नाही तर सामना दुपारी १ वाजून २० मिनिटांपर्यंतच्या अतिरिक्त वेळेपर्यंत सुरु ठेवला जाईल)

संपादकीय

# नवा बुद्धिबळपटू मिळाल्याचा आनंद



बुद्धिबळासारखा खेळ अगदी बालवयापासून गावाखेड्यांपासून शहरे-महानगरांमध्येही खेळला जातो; परंतु या क्षेत्रातील चमकदार खेळाडूंची नावे सांगा असे विचारल्यास जगज्जेता विश्वनाथ आनंदखेरीज अन्य नावे सांगणारे हजारांत दहा जणही भेटणार नाहीत. त्यामुळेच डी गुकेश या तरुण, तडफदार बुद्धिबळपटूने जागतिक अजिंक्यपद मिळवण्याचा महाविक्रम करूनही त्याचा म्हणावा तेवढा आनंद देशात दिसला नाही. अर्थात, त्यामुळे त्याच्या यशाचे मोल तसूभरही कमी होत नाही. डी गुकेश जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेचा विजेता ठरला आणि विश्वनाथन आनंद यांच्यानंतर भारताचा दुसरा विश्वविजेता ठरला आहे. डी गुकेश याने सिंगापूरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या महाअंतिम सामन्यात डिंग लिरेन याच्यावर मात करत ही कामगिरी केली आहे. डी गुकेशने १४ डावांनंतर साडेसात आणि साडेसहा अशा फरकाने पराभव करत वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा बहुमान मिळवला. गुकेश वर्ल्ड चॅम्पियन होणारा सर्वात युवा बुद्धिबळपटू ठरला आहे. वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी त्याने ही जगज्जेतेपद पटकावण्याची कामगिरी केली आहे. या यशामुळे तब्बल १२ वर्षांनंतर भारताला नवा चॅम्पियन मिळाला आहे. डी गुकेशआधी २०१२ साली विश्वनाथन आनंद यांनी जागतिक अजिंक्यपदावर आपले नाव कोरले होते. अथक प्रयत्नांनंतर भारताला जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत महाशक्ती म्हणून नावारूपास येण्यात यश आले आहे. सिंगापूरमधील जागतिक अजिंक्यपद स्पर्धे आधी पार पडलेल्या ऑलिम्पियाडमध्ये पुरुष वर्गात गुकेश आणि अर्जुन एरिगेसी तसेच महिला वर्गातील दिव्या देशमुख आणि अवंतिका अग्रवालने व्यक्तिगत सुवर्णपदक पटकावले होते. गुकेशने पहिल्या बोर्डवर खेळत दहा पैकी आठ डाव जिंकले होते. त्यावेळी ३०५६ रेटिंग मिळवणारा तो ऑलिम्पियाडमधील एकमेव खेळाडू म्हणून गौरवला गेला. गुकेश हा मूळचा चेन्नईचा आहे. आई मायक्रोबायोलॉजिस्ट आणि वडील डॉक्टर अशा उच्चशिक्षित पालकांच्या संगोपनातून गुकेशची जडणघडण झाली. तथापि, गुकेशला वेगळी म्हणजे बुद्धिबळाची आवड होती. वयाच्या अवघ्या ७ व्या वर्षापासून त्याने बुद्धिबळ खेळण्यास सुरुवात केली आणि ११ वर्षांनंतर आज तो जगज्जेता बनला आहे. हे यश नव्या पिढीतील प्रत्येक मुलामुलींसाठी प्रेरणादायी आहे. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडता' ही म्हण विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून शिकवली जाते; पण त्याचे प्रत्यक्ष जीवनात अनुकरण करून किती मोठी झेप घेता येते, याचा आदर्श म्हणून गुकेशच्या यशोगाथेकडे पाहावे लागेल.

# आज जागतिक ध्यान दिवस

**जागतिक ध्यान दिन हा ध्यानाच्या परिवर्तनशील सरावाला विराम देण्याचा, प्रतिबिंबित करण्याचा आणि स्वीकारण्याचा दिवस म्हणून जागतिक स्तरावर साजरा केला जातो. २१ डिसेंबर हा महत्त्वाचा दिवस आपल्या वेगवान जीवनात शांतता आणि सजगतेच्या महत्त्वाची आठवण करून देतो. अनेकदा अराजकता आणि विचलनाचे वर्चस्व असलेल्या जगात, जागतिक ध्यान दिन हे ध्यानाचे सखोल फायदे जाणून घेण्यासाठी आणि आतल्या शांततेशी पुन्हा कनेक्ट होण्याचे आमंत्रण आहे.**

**ध्यान म्हणजे काय?**

शांतता, मानसिक स्पष्टता आणि आंतरिक शांतता जोपासण्यासाठी, शांतपणे बसण्याची, अनेकदा बंद डोळ्यांनी गतिहीन आणि आरामदायी स्थितीत बसण्याची प्रथा म्हणजे ध्यान. हे विचार काढून टाकणे किंवा त्यांना दडपून टाकण्याबद्दल नाही तर ते संलग्नक किंवा निर्णय न घेता त्यांचे निरीक्षण करण्याबद्दल आहे. ध्यानाद्वारे, तुम्ही तुमचे विचार आणि तुमची जागरुकता यांच्यात एक जागा निर्माण करता, ज्यामुळे मन नैसर्गिकरीत्या शांततेत स्थिरावते. ध्यान हा एक सखोल वैयक्तिक अनुभव आहे, तरीही त्याचे परिणाम सार्वत्रिक आहेत. तुमची जागरूकता वाढवताना ते विश्रांतीची स्थिती वाढवते. सातत्याने ध्यानाचा सराव केल्याने, व्यक्ती चेतनेच्या खोल स्तरांवर प्रवेश करू शकतात, मानसिक आवाज कमी करू शकतात आणि शांतता आणि स्पष्टतेची गहन भावना अनुभवू शकतात.

**ध्यानाचे फायदे**

ध्यानामुळे मानसिक आरोग्याच्या पलीकडे वाढणारे अनेक फायदे मिळतात, शारीरिक आणि भावनिक आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडतो. नियमित ध्यान सरावाचे काही परिवर्तनकारी परिणाम पाहू या:

**१. तणाव कमी करणे**

ध्यानाचा सर्वात सुप्रसिद्ध फायदा म्हणजे तणाव कमी करण्याची क्षमता. सध्याच्या क्षणावर लक्ष केंद्रित करून आणि मानसिक बडबड सोडून, ध्यान केल्याने कोर्टिसोलची पातळी कमी होण्यास मदत होते. तणावाशी संबंधित हार्मोन. यामुळे आराम आणि सहजतेची चिरस्थायी भावना निर्माण होते.

**२. सुधारित एकाग्रता आणि फोकस**

ध्यान श्वासोच्छ्वास किंवा मंत्र यासारख्या एका बिंदूवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मनाला प्रशिक्षण देते. कालांतराने, ही सराव एकाग्रता आणि संज्ञानात्मक कार्य सुधारते, तुम्हाला दैनंदिन जीवनात अधिक उपस्थित आणि उत्पादक राहण्यास मदत करते.

**३. वर्धित भावनिक कल्याण**

नियमित ध्यान जीवनाबद्दल अधिक सकारात्मक दृष्टिकोन वाढवते. निर्णय न घेता विचार आणि भावनांचे निरीक्षण करून, व्यक्ती त्यांच्या भावनांचे अधिक चांगले नियमन करू शकतात, ज्यामुळे



भावनिक लवचिकता आणि आनंद वाढतो.

**४. शारीरिक आरोग्य फायदे**

ध्यान हे फक्त मनासाठीच नाही तर त्याचा शरीरालाही फायदा होतो. अभ्यास दर्शविते की ते रक्तदाब कमी करू शकते, रोगप्रतिकारक शक्ती वाढवू शकते आणि संपूर्ण शारीरिक आरोग्य सुधारू शकते. ध्यानामुळे निर्माण होणारा विश्रांतीचा प्रतिसाद शरीराला स्वतःची दुरुस्ती करण्यास आणि संतुलन राखण्यास मदत करतो.

**५. चांगली झोप**

तणाव आणि अतिक्रियाशील मनामुळे बरेच लोक झोपेच्या विकारांशी झुंजतात. ध्यानामुळे मन शांत होण्यास मदत होते, त्यामुळे झोप लागणे आणि पुनर्संचयित विश्रांतीचा आनंद घेणे सोपे होते.

**६. ध्यान आणि मानसिक आरोग्य**

मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी ध्यान हे एक शक्तिशाली साधन आहे. हे भावनांवर प्रक्रिया करण्यासाठी, तणाव कमी करण्यासाठी आणि जागरूकता विकसित करण्यासाठी एक सुरक्षित जागा प्रदान करते.

**७. चिंता आणि नैराश्य कमी**

सजगता आणि ॲटॅचमेंटवर ध्यान केंद्रित केल्याने चिंता आणि उदासीनतेचे चक्र खंडित होण्यास मदत होते जी अनेकदा चिंता आणि नैराश्यासोबत असते. जामा इंटर्नल मेडिसिनमध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासासारखे अभ्यास दाखवतात की माइंडफुलनेस मेडिटेशन प्रोग्राम्स चिंता, नैराश्य आणि तणावाची लक्षणे लक्षणीयरीत्या कमी करू शकतात.

**८. वाढलेली आत्म-जागरूकता**

ध्यान आत्म-चिंतनास प्रोत्साहन देते, तुम्हाला तुमचे विचार आणि भावनिक ट्रिगर समजण्यास मदत करते. ही जागरूकता वैयक्तिक वाढीस प्रोत्साहन देते आणि तुम्हाला जीवनातील आव्हानांना अधिक स्पष्टतेने प्रतिसाद देण्यास अनुमती देते.

**९. भावनिक नियमन**

ध्यानाचा सराव करून, व्यक्ती त्यांच्या भावनांवर चांगले नियंत्रण ठेवू शकतात. आवेगपूर्ण प्रतिक्रिया देण्याऐवजी, ध्यान अधिक मोजमाप आणि विचारशील प्रतिसाद वाढवते, निरोगी नातेसंबंध आणि निर्णय घेण्यास हातभार लावते.

**योग मन आणि शरीराला ध्यानासाठी कसे तयार करतो**

* योग आणि ध्यान या सखोलपणे एकमेकांशी जोडलेल्या पद्धती आहेत. योग शरीर आणि मनाला ध्यानासाठी तयार करतो, शांतता आणि जागरुकतेसाठी आदर्श परिस्थिती निर्माण करतो.

* शारीरिक आराम वाढवणे योगामध्ये शरीर ताणणे आणि बळकट करणे समाविष्ट आहे, ज्यामुळे अस्वस्थतेशिवाय ध्यानात बसणे सोपे होते. एक लवचिक आणि मजबूत शरीर दीर्घ आणि अधिक केंद्रित ध्यान सत्रांना अनुमती देते.

* मानसिक शांततेला चालना देणे योगामध्ये आवश्यक असलेले मानसिक लक्ष मनाला शांत करण्यास मदत करते, सखोल ध्यान अनुभवासाठी स्टेज सेट करते. योगाभ्यास करून, तुम्ही तुमच्या श्वासाशी जोडले जाण्यास आणि उपस्थित राहण्यास शिकता, जे नैसर्गिकरीत्या ध्यानात बदलते.

* श्वासोच्छ्वासाचे नियमन प्राणायाम किंवा श्वास नियंत्रण हा योगाचा मुख्य घटक आहे. ही श्वासोच्छवासाची तंत्रे मेंदूला ऑक्सिजनचा प्रवाह वाढवतात, मज्जासंस्था शांत करतात आणि मानसिक स्पष्टता वाढवतात. या सर्व गोष्टी ध्यानासाठी महत्त्वपूर्ण आहेत. योग हे ध्यानाचे प्रवेशद्वार म्हणून काम करते, अभ्यासकांना सातत्यपूर्ण सरावासाठी आवश्यक असलेली शिस्त आणि सजगता निर्माण करण्यास मदत करते.

**'जागतिक ध्यान दिवस' म्हणून जाहीर**

२१ डिसेंबर हा 'जागतिक ध्यान दिवस' म्हणून साजरा केला जावा, हा लिश्टनस्टाईन या देशाने मांडलेला आणि भारतासह अनेक देशांनी अनुमोदन दिलेला प्रस्ताव संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने शुक्रवार, ६ डिसेंबर रोजी एकमताने मंजूर केला, अशी माहिती संयुक्त राष्ट्रांतील भारताचे प्रतिनिधी पर्वतनेनी हरीश यांनी दिली. ते म्हणाले की, २१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रांनी मंजूर केला. 'वसुधैव कुटुंबकम् ' (संपूर्ण जग एक कुटुंब आहे) अशी भारताची धारणा आहे. माणसाच्या कल्याणासाठी सर्व जगाने एकजुटीने प्रयत्न करायला हवे, असे भारताला वाटते. जगभरात २१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यासाठी २०१४ साली भारताने पुढाकार घेतला होता.

## जागतिक ध्यान दिवस कसा साजरा करायचा

* जागतिक ध्यान दिन ही शांतता आणि सजगता स्वीकारण्याची संधी आहे.

* **ग्रुप मेडिटेशनमध्ये सामील व्हा** : जागतिक ध्यान दिनानिमित्त अनेक संस्था सामूहिक ध्यान सत्र आयोजित करतात. समूह प्रॅक्टिसमध्ये भाग घेतल्याने समुदायाची भावना आणि सामायिक हेतू वाढतो.

* **मौनासाठी वेळ द्या** : २१ डिसेंबरला मूक बसून ध्यानाचा सराव करण्यासाठी वेळ बाजूला ठेवा. काही मिनिटे देखील तुमच्या मानसिक स्पष्टतेमध्ये आणि आरोग्यामध्ये लक्षणीय फरक करू शकतात.

* **विविध ध्यान तंत्र एक्सप्लोर करा** : ध्यानाचे विविध प्रकार वापरून पाहा, जसे की माइंडफुलनेस, प्रेमळ–दयाळूपणा किंवा अतींद्रिय ध्यान. विविध तंत्रांचा प्रयोग केल्याने तुम्हाला सर्वात जास्त आवडेल असे शोधण्यात मदत होऊ शकते.

* **तुमच्या दिनक्रमात ध्यानाचा समावेश करा** : सातत्यपूर्ण ध्यान सराव विकसित करण्यासाठी जागतिक ध्यान दिनाचा प्रारंभ बिंदू म्हणून वापर करा. लहान सत्रांसह सुरुवात करा आणि हळूहळू कालावधी वाढवा कारण तुम्ही अधिक आरामदायक व्हाल.

* **सराव सामायिक करा** : जागतिक ध्यान दिवस साजरा करण्यासाठी मित्र आणि कुटुंबीयांना तुमच्यासोबत सामील होण्यासाठी प्रोत्साहित करा. तुमचे अनुभव सामायिक करा आणि त्यांना ध्यानाच्या परिवर्तनीय शक्तीची ओळख करून द्या.

ध्यान ही एक देणगी आहे जी आपण स्वतःला देऊ शकतो – एक सराव जी आपल्याला आपल्या खऱ्या स्वभावाशी जोडते आणि आपल्या व्यस्त जीवनात शांतता आणते. २१ डिसेंबर रोजी आपण जागतिक ध्यान दिन साजरा करत असताना, आपण आतल्या शांततेचा आदर करू या आणि या कालातीत सरावाचे सखोल फायदे स्वीकारू या.

आपल्या जीवनात ध्यानाचा समावेश करून, आपण वाढ, उपचार आणि आनंदासाठी जागा तयार करतो. तुम्ही अनुभवी अभ्यासक असाल किंवा ध्यानासाठी नवीन असाल, हा दिवस विराम देण्यासाठी, प्रतिबिंबित करण्यासाठी आणि पुन्हा कनेक्ट करण्यासाठी एक स्मरणपत्र आहे. ध्यानाची शक्ती तुम्हाला अधिक शांत आणि परिपूर्ण जीवनाकडे मार्गदर्शन करू द्या.

# राज्यभरात पुढील दोन दिवस रेशन पुरवठा ठप्प

मुंबई, दि. १४- राज्यभरात स्वस्त धान्य दुकानांमधला रेशन पुरवठा ठप्प झाला असून त्यामुळे ७ कोटी लोकांसमोर मोठी अडचण निर्माण झाल्याचे दिसतेय. लाभार्थ्यांची माहिती इंटरनेटवर अपडेट करत असल्याने धान्य वाटप होणार नसल्याची माहिती आहे. त्यामुळे पुढील दोन दिवस रेशनिंग दुकानावर धान्य वाटप होणार नाही.

राज्यभरातील रेशनिंग लाभार्थ्यांची माहिती सेव्ह केली जाते त्या क्लाऊडची मुदत संपल्याने सर्व डेटा दुसरीकडे शिफ्ट करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे आणखी दोन दिवसांनी रेशनिंग वाटप सुरळीत होईल अशी माहिती आहे. राज्यात अंदाजे ७ कोटी लाभार्थी असून या महिन्यातील आतापर्यंत ५ टक्के रेशन वाटप करण्यात आले आहे. दरम्यान, या ई पॉस मशीनच्या समस्येमुळे रेशन धान्याचा काळा बाजार वाढण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.

**ई-पॉस मशीनची प्रक्रिया धिमी**

राज्यात सध्या रेशनवर मिळणाऱ्या धान्य वितरण व्यवस्था प्रणालीचा बोजवारा उडाल्याचे चित्र पाहायला मिळतंय. ई-पॉस मशीनवर मिळणारे राशन आणि तिची प्रक्रिया अत्यंत धिम्या गतीने सुरू आहे. एखादा लाभार्थ्याला जर रेशन मिळवण्याची वेळ आली तर त्या रेशन कार्डची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी साधारणता पंधरा-वीस मिनिटे ते अर्ध्या तासापेक्षाही जास्त वेळ लागत आहे. त्यामुळे धान्य वितरण करणे आता वितरकांना मोठे कठीण होऊन बसलंय. जुन्या पद्धतीचे ई पॉस मशीन बंद करून नवीन तंत्रज्ञान असलेली ई पॉस मशीन वितरकांना देण्यात आले आहेत. मात्र, जुन्या मशीन पेक्षाही नवीन मशीन त्रासदायक ठरत असल्याने ग्राहकासह वितरकांना मोठा त्रास सहन करावा लागतोय.

हे सायं दैनिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक, मुद्रक **औदुंबर अशोक खेलबुडे** यांनी **व्यंकटेश प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन** मार्डी ता.उत्तर सोलापूर. जिल्हा सोलापूर महाराष्ट्र येथे छापून प्रकाशित केले.
❍ **संपादक- औदुंबर अशोक खेलबुडे. मोबाईल नं.८०५५६२०१५५**

**OWNED, PRINTED AND PUBLISHED BY** AUDUMBAR ASHOK KHELBUDE A/P MARDI,TAI-NORTH SOLAPUR, DIS- SOLAPUR.413002 [MAH].
**PRINTED AT** VYANKATESH PRINTERS AND PUBLICATION. A/P- MARDI TAL-NORTH SOLAPUR DIS- SOLAPUR413002 MAH .
**PUBLISHED AT** A/P- MARDI TAL-NORTH SOLAPUR DIS- SOLAPUR413002 MAH .
❍ **EDITOR- AUDUMBAR ASHOK KHELBUDE CELL- 8055620155**
❍ **E-Mall : sayanupdate@gmail.com TITL E-CODE.-MAHMAR- 51831**

## न्यायाधीशांनी सोशल मीडियाचा वापर टाळावा; सर्वोच्च न्यायालयाचे महत्वपूर्ण निरीक्षण

नवी दिल्ली, दि. १४- न्यायाधीशांनी सोशल मीडियाचा वापर करणे किंवा निकालांवर मत व्यक्त करणे टाळावे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नोंदवले. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने दोन महिला न्यायाधीशांना निलंबित केल्याच्या प्रकरणाची सुनावणी करताना हे मौखिक निरीक्षण नोंदवले.

न्यायमूर्तींकडून सोशल मीडियाच्या वापरावर सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली आहे. न्यायमूर्तींनी निर्णयांबाबत कोणतेही मत व्यक्त करू नये, कारण उद्या निकालाचा संदर्भ दिला तर न्यायमूर्तींनी आपले मत या ना-त्या स्वरूपात व्यक्त केले असेल. न्यायाधीशांना खूप त्याग करावा लागतो. त्यांनी संतांसारखे जीवन जगावे आणि परिश्रमपूर्वक काम करावे, सोशल मीडियाचा वापर टाळावा, तसेच न्यायव्यवस्थेत दिखाऊपणाला जागा नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी म्हटले. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरथना आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने ही मौखिक टिप्पणी केली. हे प्रकरण मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने दोन महिला न्यायाधीशांच्या निलंबनाशी संबंधित आहे.

## सरकारला विरोधकांच्या ईव्हीएम विरोधी मोर्चाने सलामी!

नागपूर, दि. १४- राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवारी उपराजधानीत सुरू होत आहे. यासाठी रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्यासह राज्यभरातून आमदार नागपुरात येत आहेत. राज्य सरकार एकीकडे मंत्रिमंडळ विस्तार, शपथविधीत व्यस्त असताना काँग्रेस, सेना, राष्ट्रवादी असे विरोधकांनी मात्र ईव्हीएम विरोधातील वातावरण अधिक तापवण्याचा प्रयत्न चालवला आहे. इंडिया अगेन्स्ट ईव्हीएमच्यावतीने नागपुरातील गांधी गेट परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ दुपारी १२ वाजता ईव्हीएम विरोधात एक रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीचा समारोप जाहीर सभेने होणार आहे. यावेळी काँग्रेसचे नेते माजी मंत्री सुनील केदार, विजय वडेट्टीवार, शिवसेना नेता सुषमा अंधारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जितेंद्र आव्हाड आदी अनेक नेते, पदाधिकारी या मोर्चात सहभागी होणार आहेत. यापूर्वी देखील संविधान चौकातून माजी मंत्री सुनील केदार यांच्या नेतृत्वात बाईक रॅली काढण्यात आली. ईव्हीएम विरोधात जनजागृती करण्यात आली.

## ईव्हीएम पडताळणीची याचिका जुन्या खंडपीठासमोर जावी

नवी दिल्ली, दि. १४- ईव्हीएम पडताळणीसाठी धोरणाची मागणी करणाऱ्या याचिकेवर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या खंडपीठाने ही याचिका जुन्याच खंडपीठाकडे पाठवा, असे सांगितले. हरियाणाचे माजी मंत्री करणसिंह दलाल आणि ५ वेळा आमदार राहिलेले लखन कुमार सिंगला यांनी ईव्हीएम तपासण्यासाठी एक मजबूत यंत्रणा निर्माण करण्याची मागणी न्यायालयाकडे केली होती. ते म्हणाले की, निवडणूक आयोगाने ईव्हीएमच्या कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, व्हीव्हीपीएटी आणि सिम्बॉल लोडिंग युनिट या चार घटकांची मूळ जळलेली मेमरी आणि मायक्रो कंट्रोलर तपासण्यासाठी धोरण तयार करावे, अशीही मागणी केली.

## अल्लू अर्जुनला हायकोर्टाकडून अंतरिम जामीन मंजूर

हैदराबाद, दि. १४- पुष्पा -२ अभिनेता अल्लू अर्जुनला तेलंगणा हायकोर्टाकडून अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला. एक्स अकाऊंटवर याबाबत ट्विट करण्यात आले आहे. हैदराबादच्या संध्या थिएटरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेच्या मृत्यूप्रकरणी अल्लू अर्जुनला जामीन मिळण्याआधी १४ दिवसांची कोठडी सुनावण्यात आली होती. कोर्टाबाहेर आल्यानंतर प्रसारमाध्यमांशी अल्लू अर्जुनचे वकील सुरेश बाबू म्हणाले, कोर्टाने त्याला १४ दिवसांच्या कोठडीसाठी पाठवले आहे. दरम्यान, अभिनेता अल्लू अर्जुनला घेऊन पोलीस वाहन नामपल्ली कोर्टात पोहोचली होती. पुष्पा- २ च्या प्रिमीअरवेळी एका थिएटरमध्ये महिलेचा चेंगराचेंगरीमध्ये मृत्यू झाला होता. याप्रकरणी अल्लूला पोलिसांनी हैदराबाद येथून अटक केलीय. तत्पूर्वी अल्लू अर्जुनची वैद्यकीय तपासणीनंतर गांधी रुग्णालयातून बाहेर नेण्यात आले. यावेळचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

# 'एक देश, एक निवडणूक' विधेयक सोमवारी लोकसभेत सादर होणार

नवी दिल्ली, दि.१४- बहुचर्चित 'एक देश, एक निवडणूक' विधेयक केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल सोमवारी (दि. १६) लोकसभेत सादर करतील. हे विधेयक चर्चेसाठी संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवले जाईल. लोकसभा आणि देशातील विविध राज्यांमधील विधानसभा निवडणुकीत एकाच वेळी घेण्यासाठी पहिले दुरुस्ती विधेयक मांडण्यात येणार आहे. दुसरे विधेयक दिल्ली आणि जम्मू-काश्मीर आणि पुद्दुचेरीच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यासाठी आणले जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दीर्घकाळापासून एक देश, एक निवडणुकीचे समर्थक आहेत. त्यांनी २०१९ मध्ये ७३ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वप्रथम एक देश, एक निवडणूक ही त्यांची कल्पना मांडली होती.केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवार, १२ डिसेंबर रोजी 'एक देश, एक निवडणूक' विधेयकाला मंजुरी दिली. यापूर्वी सप्टेंबरमध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने 'एक देश, एक निवडणूक' या कोविंद समितीच्या अहवालाला मंजुरी दिली होती. आता हे विधेयक केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल सोमवारी (दि. १६) लोकसभेत सादर करतील.

## अश्विनी भिडे यांची मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती



मुंबई, दि. १४- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांची मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्यावतीने शुक्रवारी काढण्यात आले आहेत. सध्या ब्रिजेश सिंह मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिवपदी कार्यरत आहेत. त्यांच्या जागी भिडे यांची बदली करण्यात आली आहे.

## गाझा पट्टीवर इस्त्रायलचा पुन्हा भीषण हल्ला; ३० पॅलेस्टिनी ठार

तेल अवीव, दि. १४- इस्त्रायल-हमास युध्द दिवसेंदिवस अधिक रक्तरंजित होत चालेले आहे. यामध्ये आतापर्यंत हजारो नागरिकांना लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. मध्य गाझा पट्टीमधील पोस्ट ऑफिसवर झालेल्या हवाई हल्ल्यात किमान ३० पॅलेस्टिनी ठार आणि ५० जखमी झाले आहेत. त्यामुळे गुरुवारी एन्क्लेव्हमधील मृतांची संख्या ६६ झाली असल्याचे वृत्त 'रॉयटर्स'ने दिले आहे.

इस्त्रायल पॅलेस्टिन संघर्ष मागील १४ महिन्यांपासून सुरु आहे. नुसेरात कॅम्पमधील पोस्ट ऑफिसवर गुरुवारी हवाई हल्ला करण्यात आला. येथे विस्थापित कुटुंबांनी आश्रय घेतला होता. इस्त्रायलच्या हल्ल्यात पोस्ट परिसरातील अनेक घरांचेही नुकसान झाले, असे डॉक्टरांनी 'रॉयटर्स'ला सांगितले. या हल्ल्यात इस्त्रायली हल्ल्यात किमान ३० पॅलेस्टिनी ठार झाले आहेत.

## सीरियातील ७७ भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढले : परराष्ट्र मंत्रालय

नवी दिल्ली, दि. १४- सीरियातील अंतर्गत युद्धात बंडखोर गटाची सरशी झाल्याने राष्ट्राध्यक्ष बशर अल असद हे देश सोडून पळून गेले आहेत. यानंतर बंडखोरांनी सीरियाची राजधानी दमास्कससह सीरियावर ताबा मिळवला आहे. अशा परिस्थितीत भारताने सीरियामधून आपल्या सर्व नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढले आहे. बंडखोरांनी राजधानी दमास्कससह अनेक प्रमुख शहरांवर कब्जा केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे.

यासंदर्भात परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी माहिती दिली. यावेळी, सीरियामध्ये असलेल्या ज्या भारतीय नागरिकांना भारतात परतायचे होते. अशा नागरिकांना आम्ही सुरक्षितपणे बाहेर काढले आहे, आतापर्यंत ७७ भारतीयांना सीरियातून बाहेर काढण्यात आले आहे, असे रणधीर जयस्वाल यांनी सांगितले.



मुंबई: दिवंगत दिग्गज अभिनेते आणि चित्रपट निर्माते राज कपूर यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याच्या कार्यक्रमात ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेते रणधीर कपूर आणि नीतू कपूर यांच्यासह कपूर कुटुंबातील इतर सदस्य उपस्थित होते.

## भाजपचे हिंदुत्व आता काय करतेय : उध्दव ठाकरे



मुंबई, दि. १४- बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार सुरूच आहेत. यावर भाजपकडून कोणतेही भाष्य केले जात नाही. भाजपचे हिंदुत्व केवळ मतापुरतं मर्यादेत आहे का? भाजपचे हिंदुत्व आता काय करत आहे?, असा हल्लाबोल शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांनी शुक्रवारी केला. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी उध्दव ठाकरे म्हणाले की, बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचारावर चर्चे साठी आमच्या खासदारांची वेळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाकारली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांगलादेशबाबत काय ठोस भूमिका घेणार हे स्पष्ट करावे, अशी मागणी देखील उध्दव ठाकरे यांनी केली. इथे केवळ बटेंगे तो कटेंगे असे म्हणून काही उपयोग नाही. बांगलादेशात हिंदूंची हत्या केली जात आहे, तर आता तुम्ही काय करणार? असा सवालही त्यांनी यावेळ केला. भाजप हिंदूंची मंदिरे वाचवू शकला नाही. तर भाजपच्या हिंदुत्वाची व्याख्या तरी आम्हाला कळावी, असे देखील ठाकरे म्हणाले.

**निवडणूक निकालाबद्दल लोकांच्या मनात धक्का : ठाकरे**

हिंदूंवर अत्याचार होत असतील तर बांगलादेशसोबत क्रिकेट खेळणे योग्य नाही, असे देखील मत ठाकरे यांनी व्यक्त केले. संसदेत महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होत नाही. नको त्या विषयांवर चर्चा होत आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालावर ते म्हणाले, निकालाबद्दल लोकांच्या मनात धक्काच आहे. बहुतमत मिळाले तरी अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार नाही, असेही ते यावेळी म्हणाले.

## १३ डिसेंबर, वेळ १३.१३, ३३ मिनिटांचे भाषण; लोकसभेत प्रियंका गांधींचा असा हा योगायोग

नवी दिल्ली, दि. १४- लोकसभेत संविधानावरील चर्चेला सत्ताधारी पक्षाकडून संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सुरुवात केली. प्रत्युत्तर म्हणून काँग्रेसने प्रियंका गांधी यांना संधी दिली. आपल्या पक्षाच्या विश्वासावर खरे उतरत वायनाडच्या खासदार प्रियंका गांधी यांनी सत्ताधारी पक्षाला सहजतेने आणि सौम्यतेने कोंडीत पकडण्यात कोणतीही कसर सोडली नाही. संसदेतील आपल्या पहिल्याच भाषणात त्यांनी परिपक्वता दाखवली आणि ईव्हीएमपासून शेतकरी ते दलितांपर्यंतच्या मुद्द्यांवर आपली मते मांडून सरकारला कोंडीत पकडले.

काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी १३ तारखेला १३.१३ वाजता आपले भाषण सुरू केले. प्रियंका गांधी यांनी लोकसभेत हे ३३ मिनिटांचे पहिले भाषण केले. यात त्यांनी अदानी, ईव्हीएम, शेतकऱ्यांचे प्रश्न, जातिनिहाय जणगणना, महाराष्ट्र, गोवा यासह अनेक राज्यांतील निवडून आलेली सरकारे पाडणे, आदी मुद्दे उपस्थित केले. यासोबतच, प्रियंका गांधी यांनी सत्ताधारी पक्षाने विविध प्रकरणांमध्ये चौकशीला सामोरे जाणाऱ्या विरोधी पक्षाच्या नेत्यांचा सत्ताधारी पक्षात समावेश केल्याचा खरपूस समाचार घेतला.

## तुमची हिंदूविरोधी भूमिका अख्या महाराष्ट्राने बघितली; भाजपचे ठाकरेंना प्रत्युत्तर

नवी दिल्ली, दि. १४- बांगलादेशमधील हिंदू अत्याचारविरोधात उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी 'आता भाजपचे हिंदुत्व आता काय करतंय...'? की केवळ मतांपुरतेच भाजपचे हिंदुत्व होते का?, असा सवाल करत पंतप्रधान मोदींनी बांगलादेशवर ठोस भूमिका घ्यावी असे मत व्यक्त केले. यावर 'तुमची हिंदूविरोधी भूमिका महाराष्ट्राने बघितली', असे जोरदार प्रत्त्युत्तर भाजपने ठाकरेंना दिले आहे.

भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंवर हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून हल्लाबोल केला आहे. बावनकुळे यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे. ज्यांनी सत्तेसाठी हिंदुत्वाची कास सोडली आणि काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसले ते उद्धव ठाकरे आज हिंदूंच्या रक्षणाबद्दल बोलत आहेत. उद्धव ठाकरे तुमचं हिंदू प्रेम किती बेगडी होते हे तुमच्या अडीच वर्षांच्या सत्तेच्या काळात जनतेने बघितले. पालघरमध्ये झालेले साधूंचे हत्याकांड आणि तुमची हिंदूविरोधी भूमिका महाराष्ट्राने बघितली.

# भारताची 'गगनयान' मोहीम घेतेय आकार

नवी दिल्ली, दि. १४- भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमच्या दिशेने शुक्रवारी एक महत्त्वाचे पहिले यशस्वी पाऊल टाकले आहे. या संदर्भातील महत्त्वाची अपडेट इस्रोने त्यांच्या अधिकृत एक्स अकाऊंटवरून दिली आहे.

इस्रोने एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, भारताच्या महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमेने पहिल्या सॉलिड मोटर सेगमेंटचे प्रक्षेपण संकुलात यशस्वी स्थलांतर केले आहे. मानवी अंतराळ उड्डाणासाठी भारताच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सज्ज असलेल्या HLVM3 G1 उड्डाणाच्या तयारीसाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. त्यामुळे भारताचे मानवी अंतराळ उड्डाणाचे स्वप्न आता आकार घेत असल्याचे देखील इस्रोने म्हटले आहे.

**२०२६ च्या अखेरीस गगनयान मोहिमेचे प्रक्षेपण**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) नेतृत्वाखाली गगनयान मोहिमेचे उद्दिष्ट क्रू-अवकाश मोहिमा करण्याची भारताची क्षमता प्रदर्शित करणे हे आहे. हे मानव-रेटेड लाँच व्हेईकल (HLVM3) अंतराळवीरांना पृथ्वीच्या खालच्या कक्षेत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. पहिले क्रू-अवकाश मोहीम २०२६ च्या अखेरीस नियोजित आहे. तत्पूर्वी सॉलिड मोटर सेगमेंट ट्रान्सफर हे रॉकेटच्या पहिल्या टप्प्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे देखील इस्रोने सांगितले आहे.

**२०२५ अखेरीस गगनयानाच्या क्रू विरहीत उड्डाण चाचण्या**

इस्रो या ऐतिहासिक मोहिमेकडे सातत्याने प्रगती करत आहे. व्यापक अंतराळवीर प्रशिक्षण, प्रणोदन प्रणाली चाचण्या आणि प्रक्षेपण दरम्यान सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी डिझाइन केलेल्या क्रू एस्केप सिस्टमचे एकत्रीकरण या सर्व गोष्टी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेकडून चालू आहेत. भारताचा गगनयान कार्यक्रम २०२५ च्या अखेरीस क्रू नसलेल्या चाचणी




उड्डाणाने सुरू होणार आहे, त्यानंतर अतिरिक्त क्रू नसलेल्या मोहिमा सुरू होतील.

## अजिंक्य रहाणेची बॅट पुन्हा तळपली; सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत मुंबई अंतिम फेरीत

बंगळुरु, दि. १४- सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणेच्या ५६ चेंडूत ९८ धावांच्या तडाखेबंद खेळीच्या जोरावर मुंबईने सेमी फायनलमध्ये बडोद्याला ६ विकेट्सनी नमवले आणि फायनल गाठली. रहाणेचे शतक व्हावे यासाठी सूर्यकुमार यादवने ६ चेंडूवर धाव घेतली नाही. शतकाच्या उंबरठ्यावर असणाऱ्या रहाणेला अभिमन्यूसिंग राजपूतने बाद केले.

रहाणेने ११ चौकार आणि ५ षटकारांसह मुंबईच्या विजयाचा पाया रचला. या सीझनमध्ये तिसऱ्यांदा अजिंक्य रहाणे शतक करण्यापासून हुकला आहे. या स्पर्धेतील त्याचे हे तिसरे आणि टी-२० कारकिर्दीतील ४८ वे अर्धशतक होते. रहाणेच्या तडाखेबंद खेळीमुळे त्याला प्लेअर ऑफ द मॅचचा मानकरी म्हणून निवडले गेले. या स्पर्धेतील ही त्याची तिसरी ट्रॉफी आहे. बंगळुरूतल्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या लढतीत मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. मुंबईच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करत बडोदा संघाला १५८ धावांमध्येच रोखले. बडोद्याची भिस्त हार्दिक आणि कृणाल पांड्या या बंधूंवर होती. मात्र, दोघांनाही मोठी खेळी करण्यात अपयश आले. कृणालने ३० तर हार्दिकने ५ धावांची खेळी केली. मुंबईकडून सूर्यांश शेडगेने सर्वाधिक दोन गडी बाद केले.

या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईने पृथ्वी शॉ याला झटपट गमावले. तो ८ धावा करुन तंबूत परतला. पण यानंतर अजिंक्य रहाणेला कर्णधार श्रेयस अय्यरची तोलामोलाची साथ मिळाली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ५६ चेंडूत ८८ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. श्रेयस ३० चेंडूत ४६ धावा करून बाद झाला. . श्रेयस बाद झाल्यानंतर रहाणेने मुंबईच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

## पाटीदारच्या खेळीमुळे मध्य प्रदेश अंतिम फेरीत

बंगळुरु, दि. १४- सय्यद मुश्ताक अली स्पर्धेतील दुसऱ्या उपांत्य सामन्यात रजत पाटीदार याचा जलवा पाहायला मिळाला. एम चिन्नास्वामी स्डेडियमवर रंगलेल्या दिल्ली विरुद्धच्या सामन्यात मध्य प्रदेश संघाने धमाकेदार विजय नोंदवला. नेतृत्व करताना बॅटिंगमधील कर्तृत्वाच्या जोरावर पाटीदारने आपल्या संघाला फायनलमध्ये नेण्यास पुढाकार घेतला.

मध्य प्रदेश संघाची सुरुवात खराब झाली होती. अनुभवी इशांत शर्मा आणि हिमांशूने आघाडीच्या फलंदाजांना स्वस्तात तंबूचा रस्ता दाखवून दिल्लीसाठी फायनलच्या आशा पल्लवित केल्या होत्या. संघाची अवस्था ३ बाद ४६ धावा अशी असताना कर्णधार रजत पाटीदार याने हरप्रीत भाटीयासोबत डाव सावरण्याची जबाबदारी सांभाळली. या दोघांनीच संघाचा विजय निश्चित केला. पाटीदारने हरप्रीत सिंग भाटीयाच्या साथीने शतकी भागीदारी करत संघाला १६ व्या षटकातच विजय नोंदवून दिला. पाटीदारने २९ चेंडूत ६६ धावा कुटल्या. दुसऱ्या बाजूला हरप्रीत सिंगने ३८ चेंडूत ४ नाबाद ४६ धावांची खेळी करत कॅप्टनला सुरेख साथ दिली.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात २०१८ चा विजेता दिल्ली संघाने पहिल्यांदा बॅटिंग करताना धावफलकावर तोकड्या धावा लावल्या होत्या. निर्धारित २० षटकात संघाने ५ बाद १४६ धावा केल्या. विकेटकिपर अनुज रावतने संघाकडून सर्वाधिक ३३ धावांची खेळी केली. मध्य प्रदेशकडून गोलंदाजीत व्यंकटेश अय्यरने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या.

**सय्यद मुश्ताक अलीची ट्रॉफी कोण उंचावणार?**

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत मुंबईच्या संघाने पहिल्या उपांत्य सामन्यात बडोदा संघाला शह देत फायनल गाठली होती. आता दुसऱ्या उपांत्य सामन्यात मध्य प्रदेशने दिल्लीला शह देत फायनलचे तिकीट मिळवले आहे. १५ डिसेंबरला एम चिन्नास्वामी स्टेडियमवर मुंबई विरुद्ध मध्य प्रदेश यांच्यात ट्रॉफीसाठी अंतिम सामना रंगेल. यात कोण बाजी मारणार ते पाहण्याजोगे असेल.

# चॅम्पियन्स ट्रॉफी 'हायब्रीड मॉडेल'ने खेळणार!

दुबई, दि. १४- आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ 'हायब्रिड मॉडेल'वर आयोजित करण्यास मान्यता दिली आहे. आता ही स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई (संयुक्त अरब अमिराती) येथे होणार आहे.

याबाबत भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) यांच्यात एक कराराही झाला आहे. आता भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे सर्व सामने दुबईत खेळणार आहे. तर उर्वरित स्पर्धा पाकिस्तानमध्ये होणार आहे. बीसीसीआय आणि पीसीबी या दोघांनी टी-२० विश्वचषक २०२६ च्या साखळी सामन्यांसाठी पाकिस्तान भारतात जाणार नाही यावर तत्वतः सहमती दर्शवली आहे. भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना कोलंबोमध्ये खेळला जाणार आहे.



हायब्रीड मॉडेलवर चॅम्पियन्स ट्रॉफी आयोजित केल्यामुळे पीसीबीला कोणतीही भरपाई मिळणार नाही. पण त्याऐवजी पाकिस्तानला २०२७ नंतरच्या एखाद्या आयसीसी महिलांच्या स्पर्धेचे यजमानपद दिले जाईल.

या स्पर्धेसाठी भारत सरकारने भारतीय संघाला पाकिस्तानात पाठवण्याची परवानगी दिली नाही. अशा परिस्थितीत 'हायब्रीड मॉडेल' हा एकमेव पर्याय होता. बीसीसीआयने आयसीसीला पत्र लिहून या निर्णयाची माहिती दिली होती. आयसीसीच्या बैठकीत पीसीबीने 'हायब्रीड मॉडेल' अंतर्गत स्पर्धेचे आयोजन करण्यास इच्छुक नसल्यावर जोर दिला होत, पण अखेर त्यांना त्यांची भूमिका बदलावी लागली.

## शाकीबच्या गोलंदाजीवर इंग्लंड बोर्डाने घातली बंदी

लंडन, दि. १४- बांगलादेशचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू शाकीब अल हसनवर इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्ड (इसीबी) अंतर्गत होणाऱ्या स्पर्धांमध्ये गोलंदाजी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. शाकीब अल हसन कायमच विविध वादांमध्ये अडकलेला आपल्याला पाहायला मिळत आहे. पण आता सध्या नवा वाद समोर आला आहे.

सप्टेंबरमध्ये शाकिब अल हसन काऊंटी चॅम्पियनशिपमध्ये सरेकडून खेळत असताना पंचांनी त्याच्या गोलंदाजीच्या कृतीवर प्रश्न उपस्थित केले होते. या सामन्यात शाकीब अल हसनने ९ विकेट घेतल्या. २०१०-११ नंतर काऊंटी क्रिकेटमधला हा त्याचा पहिला सामना होता. या महिन्याच्या सुरुवातीला लॉफबरो विद्यापीठातील चाचण्यांमध्ये त्याची गोलंदाजीची ॲक्शन बेकायदेशीर आढळल्यानंतर त्याच्या गोलंदाजीवर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला.

एका वृत्तमाध्यमाच्या रिपोर्टनुसार, निलंबन अधिकृतपणे १० डिसेंबरपासून लागू करण्यात आले आहे. त्याच तारखेला इसीबीला लॉफबरो विद्यापीठाकडून मूल्यांकनाचे निकाल प्राप्त झाले. शाकीब हा बांगलादेश संघातील अनुभवी खेळाडूंपैकी एक आहे. त्याने काही दिवसांपूर्वीच कसोटी आणि टी-२०मधून निवृत्ती जाहीर केली होती.

इंग्लंड क्रिकेट बोर्डाने घातलेली ही बंदी उठवण्यासाठी शाकीबला आता त्याच्या गोलंदाजी ॲक्शनची पुन्हा तपासणी करावी लागणार आहे. या चाचणीत गोलंदाजी करताना त्याचा कोपर १५ अंशांपेक्षा कमी वाकला पाहिजे. ही चाचणी उत्तीर्ण झाल्यानंतरच तो इंग्लंडच्या देशांतर्गत स्पर्धेत गोलंदाजी करू शकेल.

## दक्षिण आफ्रिकेने साधली इंडियाच्या वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरी

सेंच्युरीयन, दि. १४- दक्षिण आफ्रिकेच्या संघाने पाकिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना जिंकत ३ सामन्यांची मालिकाही खिशात घातली. सेंच्युरीयनच्या सुपर स्पोर्ट्स् पार्क स्टेडियमवर रंगलेल्या या सामन्यातील विजयासह दक्षिण आफ्रिकेच्या संघाने टीम इंडियाच्या वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरी करण्याचा खास डावही साधला आहे.

मोहम्मद रिझवानच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानच्या संघाने दुसऱ्या टी-२० सामन्यात पहिल्यांदा बॅटिंग करताना यजमान दक्षिण आफ्रिकेच्या संघासमोर २०७ धावांचे टार्गेट सेट केले होते. रीझा हेंड्रिक्सच्या दमदार शतकाच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने हे आव्हान ३ चेंडू आणि ७ विकेट्स राखून विजय मिळवला. यासह आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेळा २०० पेक्षा अधिक धावांचा यशस्वी पाठलाग करणाऱ्या संघांच्या यादीत दक्षिण आफ्रिकेचा संघ टीम इंडियासोबत संयुक्तरीत्या अव्वलस्थानी पोहोचला आहे. याआधी हा वर्ल्ड रेकॉर्ड टीम इंडियाच्या नावे होता. भारतीय संघाने पाच वेळा ही कामगिरी करून दाखवली आहे. ऑस्ट्रेलियाचाही या यादीत समावेश आहे.

**टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेळा २०० पेक्षा अधिक धावांचा पाठलाग करणारे संघ**

* भारत- पाच वेळा
* दक्षिण आफ्रिका- पाच वेळा
* ऑस्ट्रेलिया- पाच वेळा

## गिलेस्पींनीही दिला प्रशिक्षकपदाचा राजीनामा; पाकिस्तान क्रिकेटचा उडालाय बोजवारा

इस्लामाबाद, दि. १४- जेसन गिलेस्पी यांनी पाकिस्तान कसोटी संघाच्या प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे. अवघ्या काही महिन्यांत ते या पदावरुन पायउतार झाले आहेत. दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी संघ दक्षिण आफ्रिकेला रवाना होण्यापूर्वी त्यांनी आपला निर्णय पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) ला कळवला. पाकिस्तान क्रिकेटचा पूर्णतः बोजवारा उडाला असून, मागील तीन वर्षांत तब्बल ९ प्रशिक्षक बदलण्यात आले आहेत. दरम्यान, दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी आकिब जावेद यांना अंतरिम प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

ऑक्टोबर महिन्यात क्रिकेटमधील दिग्गज प्रशिक्षक अशी ओळख असणारे गॅरी कर्स्टन यांनी पाकिस्तान क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षकपद सोडले होते. यानंतर जेसन गिलेस्पी यांच्याकडे प्रशिक्षकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. २६ डिसेंबरपासून दक्षिण आफ्रिका दौऱ्याला प्रारंभ होणार आहे होता. यापूर्वीच गिलेस्पी यांनी प्रशिक्षणपदाला सोडचिठ्ठी दिली आहे.

गिलेस्पी यांच्या अल्पावधीच्या काळात संमिश्र परिणाम दिसून आले. मात्र, या यशानंतरही गिलेस्पी यांना निवड समितीमधून वगळण्यात आले होते. यामुळे त्यांचे पीसीबीशी असलेले संबंध आणखी बिघडले. विशेषतः टीम निल्सन यांच्या कराराचे नूतनीकरण न करण्याच्या पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या निर्णयावरही गिलेस्पी नाराज होते. इंग्लंडविरुध्द पाकिस्तानच्या कसोटी मालिकेदरम्यान बोलताना गिलेस्पी यांनी निराशेचे संकेत दिले होते.

**आकिब जावेद यांची मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती**

गिलेस्पी यांनी प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिल्यानंतर आता कसोटी क्रिकेटसाठी 'पीसीबी'ने आकिब जावेद यांची मुख्य प्रशिक्षकपदी अंतरिम नियुक्ती केली आहे. पाकिस्तानचा संघ सध्या दक्षिण आफ्रिकेत कसोटीपूर्वी टी-२० आणि वनडे मालिका खेळणार आहे.

# आयुष्यातील सर्वांत मोठा क्षण!

### जगज्जेतेपदाचा चषक स्वीकारताना गुकेशची भावना

सिंगापूर, दि. १४- बुद्धिबळाच्या इतिहासातील सर्वांत युवा जगज्जेता ठरल्यानंतर रात्री झोप न लागल्याने दोम्माराजू गुकेशचे डोळे थोडे चुरचुरत होते. मात्र, या स्थितीतही त्याने कोणतीही तक्रार न करता शेकडो चाहत्यांना स्वाक्षऱ्या दिल्या, छायाचित्रे काढली आणि अखेरीस भव्य समारोप सोहळ्यात जगज्जेतेपदाचा चषक उंचावला. माझ्या आयुष्यातील हा सर्वांत मोठा क्षण आहे. माझे स्वप्न पूर्ण झाले आहे, अशी भावना गुकेशने व्यक्त केली.

भारताच्या १८ वर्षीय गुकेशने चीनच्या डिंग लिरेनला पराभूत करत १८वा बुद्धिबळ जगज्जेता बनण्याचा मान मिळवला. गुरुवारी हे ऐतिहासिक यश मिळवल्यानंतर शुक्रवारी त्याला जगज्जेतेपदाचा चषक देण्यात आला. त्याच्या दिवसाची सुरुवात या चषकाची एक झलक पाहूनच झाली. मात्र, त्यावेळी त्याने चषकास स्पर्श करण्यास नकार दिला. मी सायंकाळी होणाऱ्या समारोप सोहळ्याची वाट पाहात आहे, असे गुकेश म्हणाला. अखेर समारोप सोहळ्यात आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचे (फिडे) अध्यक्ष अर्कादी द्वोर्कोविच यांच्या हस्ते जगज्जेतेपदाचा चषक स्वीकारल्यानंतर गुकेशच्या चेहऱ्यावरील स्मितहास्य थांबत नव्हते.

मी हा क्षण लाखो वेळा जगल्यासारखे वाटत आहे. प्रत्येक दिवशी मी हेच (जगज्जेतेपदाचे) ध्येय बाळगून उठायचो. माझे हे ध्येय, माझे स्वप्न आता पूर्ण झाले आहे. जगज्जेतेपदाचा चषक उंचावणे हा माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठा क्षण आहे. यापेक्षा मोठे काही असूच शकत नाही, असे गुकेश म्हणाला. यावेळी त्याला १३ लाख अमेरिकन डॉलरचा धनादेशही देण्यात आला.

**मुख्यमंत्री फडणवीस यांचा गुकेशशी संवाद**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुकेशला फोन करून त्याच्याशी संवाद साधला आणि बुद्धिबळाच्या इतिहासातील सर्वांत युवा जगज्जेता ठरल्याबद्दल त्याचे अभिनंदन केले. सिंगापूरमध्ये झालेली जागतिक अजिंक्यपद लढत जिंकल्याबद्दल आणि वयाच्या १८व्या वर्षीच जगज्जेतेपद पटकावल्याबद्दल



गुकेशचे अभिनंदन करण्यासाठी त्यांच्याशी फोनवरून संवाद साधला.

**तमिळनाडू सरकारकडून पाच कोटींचे बक्षीस**

जागतिक अजिंक्यपद लढतीतील ऐतिहासिक यशानंतर चेन्नईकर गुकेशला तमिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांच्याकडून रोख पाच कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. गुकेशच्या अलौकिक यशाचा सन्मान करण्यासाठी मी त्याला पाच कोटी रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर करत आहे. त्याच्या यशाने देशाची मान उंचावली आहे. त्याने अशीच प्रगती करत राहावी यासाठी त्याला खूप शुभेच्छा, असे स्टॅलिन यांनी 'एक्स'वर लिहिले.

## गुकेशला मिळाले कोट्यवधींचे बक्षीस

सिंगापूर, दि. १४- भारताचा बुद्धिबळपटू डी गुकेशने ऐतिहासिक कामगिरी करत जागतिक बुद्धिबळ स्पर्धा जिंकली आहे. हा पराक्रम करणारा गुकेश सर्वात युवा खेळाडू ठरला आहे. गुरुवारी १४व्या आणि अंतिम डावात गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेनला पराभूत केले. या ऐतिहासिक विजयानंतर गुकेशला २.५ दशलक्ष बक्षीस पर्समधून तब्बल १.३ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ११.०३ कोटी रुपये) इतकी बक्षिसाची रक्कम मिळाली. बुद्धिबळची आंतरराष्ट्रीय संघटना फिडेच्या नियमांनुसार, अंतिम सामना खेळणाऱ्या खेळाडूंना प्रत्येक सामना जिंकण्यासाठी २० हजार डॉलर्स म्हणजेच अंदाजे १.६९ कोटी रुपये मिळतात. तर उर्वरित रक्कम दोन्ही खेळाडूंमध्ये समान प्रमाणात विभागली जाते.

डी गुकेशने चॅम्पियनशिपमध्ये तीन सामने जिंकले होते. त्याने तिसरा, ११वा आणि शेवटचा सामना जिंकला. यासाठी त्याला ६० हजार डॉलर म्हणजेच ५.०७ कोटी रुपये मिळाले. तर लिरेनने दोन सामने जिंकले आहेत ज्यासाठी त्याला ३.३८ कोटी रुपये मिळाले आहेत. उरलेली रक्कम दोघांमध्ये समान प्रमाणात विभागली गेली. म्हणजेच गुकेशला एकूण १.३५ मिलियन डॉलर्स म्हणजेच ११.४५ कोटी रुपये तर लिरेनला १.१५ मिलियन डॉलर्स म्हणजेच ९.७५ कोटी रुपये मिळाले आहेत.

दैनिक सायं अपडेट



# छाया कदम यांचा 'ऑल वुई इमॅजिन ज लाइट' ८२ व्या वार्षिक गोल्डन ग्लोब अवॉर्ड्‌समध्ये

छाया कदम यांनी २०२४ वर्षात विविध भूमिका साकारल्या आणि त्या जागतिक स्तरावर जाऊन पोहचल्या ! नुकताच त्यांचा ऑल वुई इमॅजिन ज लाइट' ला ८२ व्या वार्षिक गोल्डन ग्लोब अवॉर्ड्‌समध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (मोशन पिक्चर) श्रेणीमध्ये नामांकन मिळालं आहे आणि महत्त्वाची बाब अशी 'ऑल वुई इमॅजिन ज लाइट' एकूण दोन नामांकने मिळाली असून दुसरी एक सर्वोत्कृष्ट मोशन पिक्चर - (इंग्रजी नसलेली भाषा) साठी आहे.



विशेष म्हणजे या श्रेणीमध्ये भारतीय दिग्दर्शकाचे नामांकन होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

छाया कदम यांनी या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली असून 'ऑल वुई इमॅजिन ज लाइट'चा प्रीमियर २३ मे रोजी २०२४ कान्स चित्रपट महोत्सवात झाला होता आणि तो आता चित्रपट गृहात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाने प्रदर्शित होण्याआधी अनेक पुरस्कार पटकावले आहेत आणि आता वार्षिक गोल्डन ग्लोब अवॉर्ड्‌समध्ये नामांकन मिळवण्याचा बहुमान देखील पटकावला आहे.काही दिवसापूर्वी ऑल वी इमॅजिन अ‍ॅज लाईट' या चित्रपटाला न्यूयॉर्क फिल्म क्रिटिक्स सर्कलमध्ये सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे आणि आता हा चित्रपट पुन्हा एक नवा पुरस्कार जिंकण्यासाठी सज्ज होताना दिसतोय.

या बद्दल उत्सुकता व्यक्त करताना छा या कदम सांगतात ऑल वुई इमॅजिन ज लाइट'साठी मिळालेलं गोल्डन ग्लोब नामांकन हे माझ्यासाठी आणि संपूर्ण टीमसाठी अभिमानाचा क्षण आहे. भारतीय सिनेमा जागतिक स्तरावर पोहोचतोय, याचा आनंद वाटतो. हा चित्रपट माझ्या हृदयाच्या जवळ आहे; तो मानवी भावना, संघर्ष आणि प्रकाशाच्या शोधाबद्दल आहे. माझ्या सहकाऱ्यांनी दिलेल्या अथक प्रयत्नांमुळे हे यश शक्य झालं. या नामांकनाने आम्हाला पुढे आणखी उत्तम कथा सांगण्यासाठी प्रेरणा मिळाली आहे. प्रेक्षकांनी दाखवलेल्या प्रेमासाठी आणि पाठिंब्यासाठी मी मनःपूर्वक आभारी आहे.

ऑल वी इमॅजिन अ‍ॅज लाईट'मध्ये छाया कदम, कानू कुसरुती, दिव्या प्रभा आणि यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट फ्रान्समधील 'पेटीट काओस' आणि भारतातील 'चॉक अँड चीज' आणि 'अनदर बर्थ' यांची अधिकृत इंडो-फ्रेंच सहनिर्मिती आहे.

# हैदराबाद पोलिसांनी केली सुपरस्टार अल्लू अर्जुनला अटक


नवी दिल्ली : दाक्षिणात्य अभिनेता सुपरस्टार अल्लू अर्जुनला हैदराबाद पोलिसांनी अटक केली आहे. यामुळे संपूर्ण चित्रपटसृष्टीत एकच खळबळ उडाली आहे. कारण, त्याचा बहुचर्चित 'पुष्पा २' हा नुकताच देशभर प्रदर्शित झाला आहे. तसेच, बॉक्स ऑफिसवर तो तुफान कमाई करत आहे. असे असताना त्याला झालेली अटक ही त्याच्या चाहत्यांसाठी मोठी धक्कादायक बाब आहे. दरम्यान, याचा पुष्पा २ च्या एका प्रीमियर दरम्यान अल्लू अर्जुनची एक झलक पाहण्यासाठी झालेल्या गर्दीत चेंगराचेंगरी झाली आणि त्यात एका महिलेचा मृत्यू झाला. दरम्यान, अल्लू अर्जुनला ही बातमी कळल्यानंतर त्याने मृत महिलेच्या कुटुंबाला २५ लाखांची मदत करणार असल्याचे सांगितले होते.

नुकताच दाक्षिणात्य अभिनेता आणि सुपरस्टार अल्लू अर्जुनचा बहुचर्चित पुष्पा २ हा देशभरात थाटामाटात प्रदर्शित करण्यात आला. यावेळी देशभरातील अनेक शहरांमध्ये पुष्पा २ च्या प्रमोशनसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी अल्लू अर्जुनला पाहण्यासाठी त्याच्या चाहत्यांनी तौबा गर्दी केली होती. दरम्यान, देशभरात हा चित्रपट प्रदर्शित होण्याआधी एक प्रीमियर ४ डिसेंबर रोजी हैदराबादमधील संध्या या चित्रपटगृहात आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्याची एक झलक पाहण्यासाठी त्याच्या चाहत्यांनी गर्दी केली होती. यादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत एका ३५ वर्षीय महिला एम. रेवतीचा श्वास गुदमरल्यामुळे मृत्यू झाला. तसेच, तिच्या नऊ वर्षांच्या मुलाची प्रकृती सध्या गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणानंतर अभिनेता अल्लू अर्जुनविरोधात एफआयआर दाखल करण्यात आली होती.

अभिनेता अल्लू अर्जुनवर गुन्हा दाखल केल्यानंतर त्याने तेलंगणा उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावेळी त्याने ही एफआयआर रद्द करण्याची मागणी केली होती. ४ डिसेंबर रोजी घडलेल्या या घटनेनंतर ५ डिसेंबरला अभिनेता अल्लू अर्जुन, त्याची चित्रपटाची संपूर्ण टीम आणि चित्रपट व्यवस्थापनाविरोधात चिक्कडपल्ली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास सीआयडी टीम सज्ज

गुन्ह्याचा आणि गुन्हेगारांचा शोध घेणारा अत्यंत लोकप्रिय झालेला उखऊ हा शो सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन वर २१ डिसेंबर २०२४ पासून पुनरागमन करण्यास सज्ज आहे. दर शनिवारी आणि रविवारी रात्री १० वाजता त्याचे प्रसारण करण्यात येईल. शिवाजी साटम (-उझ प्रद्युमन), दयानंद शेट्टी (दया) आणि आदित्य श्रीवास्तव (अभिजीत) हे कलाकार पुन्हा एकदा त्याच्या गाजलेल्या भूमिकेत दिसणार आहेत. एका दिलखुलास मुलाखतीत या शोच्या पुनरागमनाबद्दल दयानंद शेट्टी बोलत होते.




खरं सांगायचं तर, आम्ही जेव्हा पहिल्यांदा उखऊ सुरू केली, तेव्हा आमच्यातल्या कोणालाच ही कल्पना नव्हती ही मालिका इतकी लोकप्रिय होईल आणि एकामागून एक दशके लोक या मालिकेवर प्रेम करतील. उखऊ ने हा दर्जा मिळवला, त्याच्या मागे समस्त टीमचे परिश्रम आहेत- आमचे लेखक, दिग्दर्शक, सह-कलाकार आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आमच्या चाहत्यांनी दिलेले प्रेम. या गोष्टीचा मला अचंबा वाटतो की वेगवेगळ्या वयोगटातील, पिढ्यांमधील लोक अजूनही या मालिकेशी निगडीत आहेत. इतक्या लोकांसाठी ही मालिका इतकी जवळची झाली आहे हे पाहून मी भारावून जातो. अशा लोकप्रिय मालिकेत सहभागी असल्याची जाणीव मला नेहमीच आनंद देत राहील.

इतकी वर्षे आमच्याशी निष्ठावान राहिलेल्या आमच्या सगळ्या चाहत्यांविषयी मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. तुमचे प्रेम आणि निष्ठा हाच या मालिकेचा प्रेरणास्रोत आहे. मला माहीत आहे की, तुम्ही या मालिकेच्या नव्या सीझनची उत्सुकतेने वाट बघत आहात. मी तुम्हाला वचन देतो, तुम्ही केलेल्या प्रतीक्षेचे फळ तुम्हाला मिळेल. तुमचा उत्साह, तुमचे मेसेजिस आणि तुमचे समर्थन यामुळे इतकी वर्षे ही मालिका चालली आणि त्यानंतरही जिवंत राहिली. नवा सीझन देखील तसाच रोमांचक आणि मनोरंजक व्हावा यासाठी आम्ही प्रयत्न केला आहे आणि आम्हाला आशा आहे की, हा सीझन देखील तुमच्या जीवनात आनंद, रहस्य आणि न्याय भावना घेऊन येईल. उखऊ तुमच्यामुळेच परत येत आहे, असे दयानंद शेट्टी म्हणाला .

# 'फसक्लास दाभाडे'मधील धमाल 'यल्लो यल्लो' गाणं प्रदर्शित

सध्या सगळीकडे लग्नसराईचा हंगाम सुरू असून लग्नातील हळदी समारंभ हा सर्वात खास आणि धमाल समारंभ असतो. याच धमाल वातावरणात, 'फसक्लास दाभाडे' चित्रपटातील 'यल्लो यल्लो' गाणं एक नवा रंग घेऊन आलं आहे. नुकताच दाभाडे कुटुंबियांच्या घरातील हळदी सोहळा मोठ्या दणक्यात पार पडला. यानिमित्ताने 'यल्लो यल्लो' हे हळदीचे खास गाणंही प्रदर्शित करण्यात आलं. या सोहळ्यात दाभाडे कुटुंबाने एकत्र येऊन धमाल, मजामस्ती, नाचगाणी आणि विविध खेळ खेळत सोनू आणि कोमलचा हळदी समारंभ अगदी थाटामाटात साजरा केला. या हळदी समारंभाला हेमंत ढोमे, क्षिती जोग, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, निवेदिता सराफ, हरीश दुधाडे, राजन भिसे आणि राजसी भावे उपस्थित होते.

सोनू आणि कोमलच्या हळदी समारंभातील 'यल्लो यल्लो' गाण्यात धमाल पाहायला मिळत असून या गाण्याला अमितराज यांचे संगीत लाभले आहे. गाण्याचे बोल क्षितिज पटवर्धन यांचे असून या गाण्याने हळदी सोहळ्याचा उत्साह द्विगुणित केला आहे. या धमाकेदार गाण्यात नकाश अझीझ यांच्या आवाजाने अधिकच रंगत आणली आहे. सोनू आणि कोमलच्या हळदीचं हे गाणं प्रत्येकाला थिरकायला लावणारं आहे. 'यल्लो यल्लो' या गाण्यात हळदी समारंभातील धमाल क्षण पाहायला मिळत असून गाण्यात उत्साही वातावरणात कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा आनंद आणि मस्तीची झलक दिसतेय.

निर्माते भूषण कुमार म्हणतात, ''हे गाणं



म्हणजे आमच्या तुमच्या घरातील लग्नातले चित्रण आहे. यातील प्रत्येक व्यक्तिरेखा प्रेक्षक स्वतःमध्ये कुठेतरी शोधतील. खूप सुंदर असे सादरीकरण असून प्रत्येकाला थिरकायला लावणारे हे गाणे आहे.''

निर्माते आनंद एल राय म्हणतात, हळदीसारखा एक धमाल कार्यक्रमाचा आनंद 'यल्लो यल्लो' गाण्यात पाहायला मिळेल. दाभाडे कुटुंबातील हळदी समारंभाची मस्ती, प्रेम आणि नात्यांची मुरलेली गोडी या गाण्यात उत्तमरित्या दाखवण्यात आली आहे. या गाण्याने हळदी सोहळ्यातील धमाल रंग उधळले असून, हे गाणं प्रेक्षकांना त्यांच्या स्वतःच्या आठवणींशी जोडेल. मला खात्री आहे, हे गाणे इथून पुढे प्रत्येक हळदी समारंभात धमाल उडवेल.

दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी गाण्याबद्दल म्हणतात, हळद हा एक असा सोहळा असतो जिथे मस्ती, आनंद आणि नात्यांचे खेळ रंगतात. पारंपरिक मराठमोळ्या पद्धतीने खेळल्या जाणाऱ्या या सोहळ्याची धमाल 'यल्लो यल्लो' गाण्यात पहायाला मिळणार आहे हे मराठमोळं कौटुंबिक सेलिब्रेशन पाहायला प्रेक्षकांना नक्कीच आवडेल.

टी-सीरीज, कलर यल्लो प्रॉडक्शन आणि चलचित्र मंडळी यांचा आगामी चित्रपट 'फसक्लास दाभाडे' २४ जानेवारी २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. हेमंत ढोमे लिखित, दिग्दर्शित या चित्रपटाचे निर्माते भूषण कुमार, क्रिशन कुमार, आनंद एल राय आणि क्षिती जोग आहेत. चित्रपटाचे वितरण पॅनोरमा स्टुडिओजने केले आहे.

# कौन बनेगा करोडपतीच्या सेटवर वनवास चित्रपटाचे कलाकार

कौन बनेगा करोडपतीच्या सेटवर वनवास चित्रपटाचे कलाकारांनी उपस्थिती दर्शवली आहे. यावेळी नाना पाटेकर यांनी अमिताभ बच्चन यांना ग्राम्य जीवनातील शांतता आणि समाधान याबद्दल अनुभव सांगितले. मी तर गावाकडचा माणूस आहे आणि तिथलाच राहणार, तिथेचे बरे वाटते., असे ते म्हणाले. येत्या शुक्रवारी, कौन बनेगा करोडपती १६ मध्ये 'वनवास' चित्रपटाचे कलाकार - नाना पाटेकर, उत्कर्ष शर्मा, सिमरत कौर आणि लेखक-दिग्दर्शक अनिल शर्मा उपस्थित राहणार आहेत. यावेळी नाना पाटेकर होस्ट अमिताभ बच्चन समोर हॉटसीटवर बसणार आहेत.

त्यांच्याशी हलक्या-फुलक्या, मनमोकळ्या गप्पा मारताना अमिताभ बच्चन यांनी त्यांना विचारले की, तुम्हाला असे कधी वाटले आहे का, की आपण गावातच राहिले पाहिजे? त्यावर नाना म्हणाले की, मी या व्यवसायातील नाही, मी गावाकडचा माणूस आहे. मी इकडे काम करतो, आणि परत गावात जातो. मी गाव-खेड्यात राहतो, आणि तिथेच राहणार.

त्यानंतर बच्चन यांनी नाना पाटेकरला विचारले की, गावातली त्यांची दिनचर्या कशी असते. त्यावर नाना पाटेकरने उत्तर दिले, मी सकाळी उठतो, तिकडे मी स्वतःचे एक जिम बनवले आहे. माझ्याकडे दोन गाई आणि एक बैल आहे. आणखी काही असण्याची गरजच नाही- मीच सगळं काही करतो. न्याहारी, जेवण - माझे सगळे जेवण मीच बनवतो. मी खरोखर चांगले जेवण बनवतो. कधी कधी तर मला वाटते की, तर माझी चित्रपटात कारकीर्द झाली नसती, तर मी एक छोटेसे हॉटेल उघडले असते. पण, मी जितकी अपेक्षा केली होती, त्यापेक्षा आयुष्याने मला खूप जास्त दिले आहे. माझ्या गरजा अगदी साध्या झाल्या आहेत. संध्याकाळी, माझ्या सोबतील पुस्तकं असतात. काही मी वाचली आहेत, काही वाचलेली नाहीत. चार पाच कपाटं भरून पुस्तकं आहेत. शहरात आपल्याकडे भिंती असतात, माझ्या गावात डोंगरांनी मला वेढले आहे. मी त्यांच्या मध्यात राहतो. इतके सोपे आहे जीवन! तिकडे गजराचे घड्याळ नाही, सकाळी पक्षी मला उठवतात. आमच्याकडे मोर सुद्धा येतात, कधीकधी.

पुढे म्हणाले, तुम्ही खरोखर मला मंत्रमुग्ध केले आहे. कधी तरी यायलाच हवे तुमच्याकडे. नाना पाटेकर तत्परतेने म्हणाला, अर्थात. नक्की या. मी नेहमी माझ्या मित्रांना सांगतो की हे घर माझ्या एकट्याचे नाही. ते तुमचेही आहे. तिकडे घरासारखे वाटते, म्हणून नक्की या आणि रहा. नाम फाऊंडेशनसाठी खेळत असताना नाना पाटेकरने त्याच्या जिव्हाळ्याच्या विषयाबद्दल सांगितले. शेतकऱ्यांची आत्महत्या रोखण्यासाठी जागरूकता आणून त्यासाठी निधी उभारण्याचे काम नाना पाटेकर करतात.

# स्पाय युनिव्हर्ससाठी आलिया भट्ट आणि कियारा आडवाणी झाल्या सज्ज!

भारतीय सिनेमातील दोन ताकदीच्या अभिनेत्री, आलिया भट्ट आणि कियारा आडवाणी, २०२५ मध्ये अल्फा आणि वॉर २ च्या माध्यमातून स्पाय युनिव्हर्सला नवा आयाम देण्यासाठी सज्ज झाले आहेत. दोघींनीही आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात विशेष जागा निर्माण केली असून, आता त्या या जगात सशक्त महिला भूमिकांना नवी परिभाषा देणार आहेत.



अल्फा या चित्रपटात आलिया भट्टची भूमिका हे या युनिव्हर्ससाठी एक रोमांचक पाऊल ठरणार आहे. तिच्या उत्कृष्ट अभिनय कौशल्यामुळे ती जासूसी आणि क्शनच्या नव्या जॉनरमध्ये स्वतः ला पुन्हा सिद्ध करणार आहे. आलियाने नेहमीच आपल्या पात्रांमध्ये ताकद दाखवली आहे, ज्यामुळे तिच्या अल्फा मधील भूमिकेबाबत प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

कियारा आडवाणीचं या युनिव्हर्समध्ये येणं ही सध्याच्या काळातील सर्वात मोठी कास्टिंग अनाऊंसमेंट आहे. कियारा या स्पाय क्शन थ्रिलरमध्ये जबरदस्त स्टंट्स सीन्स मध्ये दिसणार आहे. याबाबत चाहत्यांमध्ये आधीपासूनच चर्चा होत आहे की कियाराची एनर्जी आणि अभिनयाची शैली वॉर २ मधील तिच्या भूमिकेत प्रेक्षकांचं दिलखुलास मनोरंजन करणार आहे.

आलिया भट्ट आणि कियारा आडवाणी यांच्यासारख्या दोन दमदार अभिनेत्रींच्या येण्याने स्पाय युनिव्हर्सचं आकर्षण आणखीनच वाढलं आहे, यात शंका नाही. त्यांच्या अभिनयातून या युनिव्हर्समध्ये नव्या गोष्टी अनुभवायला मिळतील, आणि २०२५ हे वर्ष बॉलिवूडसाठी स्पाय थ्रिलर्ससाठी नक्कीच ऐतिहासिक ठरणार आहे.

# जेवताना तोंडी लावण्यासाठी करा झणझणीत, चटकदार लसणीची चटणी



जेवणाबरोबर तोंडी लावण्यासाठी ठेचा किंवा लसणाची चटणी असेल तर साध्या जेवणालाही चव येते. लसणाची चटणी वडापाव, समोसा पाव भजीसोबत खूप खाल्ली जाते. आतापर्यंत तुम्ही लसणीची सुकी चटणी खूपदा खाल्ली असेल पण ओली चटणीसुद्धा ट्राय करू शकता.

नावडती भाजी असेल तर भाकरीबरोबर किंवा चपातीबरोबर किंवा वरण भाताबरोबर तुम्ही चटणी खाऊ शकता. अगदी कमीत वेळीत ही लसणीची तयार होते.

# लहान मूल सतत आई-आई करते, कडेवर-मांडीवर घे म्हणते?

लहान मुल घरात असेल की त्या घरातील आईची नुसती तारांबळ सुरू असते. एकीकडे घरातली कामं, मुलांना प्रेमाने खायला घालणे, त्यांचे आवरणे, त्यांच्याबरोबर खेळणे, त्यांच्या उद्योगांकडे लक्ष देणे आणि घरातील इतरांचे सगळे करता करता स्वत:ची तब्येत सांभाळणे.

असं सगळं करताना मुलं जर आईपासून अजिबात सुटी होत नसतील तर मात्र त्या आईचे फारच अवघड होऊन जाते. सतत मुलांना कडेवर किंवा मांडीत घेऊन बसावे लागत असेल तर त्या आईला काहीच सुधरत नाही. घरात-बाहेर सगळीकडे मूल सतत तुम्हाला चिकटून असेल तर काय करावे असा प्रश्नही अनेक पालकांना पडतो. आता लहान मुलांना आई हीच व्यक्ती सगळ्यात जवळची आणि सेफ वाटत असल्याने काही वेळा ते असं करतात. पण मुलं सतत आईला चिकटून असतील तर काय करावं याविषयी 'पॅरेंटींग डायरीज विथ प्रिती' या इन्स्टाग्राम पेजवर प्रिती याविषयी काही महत्त्वाच्या टिप्स सांगतात.



१. भावनिक गरज

मूल सतत चिकटून राहतं याला नक्कीच काहीतरी कारण असतं. मुलांची भावनिक गरज काय आहे हे आईने अशावेळी समजून घ्यायला हवे. मुलांची भूक, झोप किंवा इतर गोष्टी ज्याप्रमाणे वेगवेगळ्या असतात. त्याचप्रमाणे त्यांच्या भावनिक गरजाही वेगळ्या असू शकतात. त्यामुळे आपल्या मुलाची भावनिक गरज काय आहे हे आईने ओळखायला हवे. अशावेळी मोबाईल किंवा इतर कोणतीही कामे समोर न घेता आपण मुलासोबत पाऊण ते १ तास वेळ घालवतो आहोत की नाही हे बघा.

२. बाहेर गेल्यावरही मूल चिकटून बसत असेल तर

अनेकदा आपण नातेवाईक किंवा मित्रमंडळींकडे काही कार्यक्रमासाठी जातो. त्यावेळी इतर मुलं छान खेळत असतात आणि आपलेच मूल आपल्याला चिकटून बसलेले असते. अशावेळी आपल्या मुलाने इतर मुलांसोबत खेळावे अशी आपली इच्छा असते. मात्र भावनिक ॲडजस्टमेंटची प्रत्येकाची पद्धत वेगळी असू शकते. दुसऱ्या वातावरणात गेल्यावर काही मुलांना लगेचच सेफ वाटेल असे नाही. त्यामुळे जोपर्यंत त्यांना सेफ वाटत नाही तोपर्यंत ते वेगळ्या वातावरणात एकटे वावरत नाहीत. अशावेळी आपण त्यांच्या मागे न लागता त्यांना पुरेसा वेळ द्यायला हवा. जेणेकरुन त्यांना सेफ वाटल्यावर ते आपल्याला सोडून मोकळे खेळायला लागतील.

# थंडीत करा डाळींचे गरमागरम सूप, ताकद वाढवणारा पौष्टीक पर्याय

थंडी म्हटली की सतत काहीतरी गरमागरम घ्यावेसे वाटते. अशावेळी चहा किंवा कॉफी घेण्यापेक्षा शरीराला ऊब मिळेल आणि ताकद वाढण्यासही मदत होईल असे सूप घेतले तर? भाज्यांचे सूप आपण नेहमीच घेतो, पण आज आपण डाळींचे सूप पाहणार आहोत.



डाळींमध्ये मोठ्या प्रमाणात प्रोटीन्स असल्याने हे सूप आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असते. त्याला लसूण, जीरे यांसारख्या गोष्टींचा तडका दिल्याने त्याची चवही अतिशय छान लागते. लहान मुलांपासून ते वयस्कर व्यक्तींपर्यंत सगळ्यांना चालणारे आणि ताकद देणारे हे सूप कसे करायचे ते पाहूया. झटपट होत असल्याने करायलाही सोपे आणि घशाला आराम देणारे हे सूप तुम्ही नक्की ट्राय करुन पाहा.

साहित्य

१. मूग डाळ - अर्धी वाटी
२. तूर डाळ - अर्धी वाटी
३. मसूर डाळ - अर्धी वाटी
४. लसूण - ७ ते ८ पाकळ्या
५. जीरे - अर्धा चमचा
६. कडीपत्ता - ६ ते ७ पाने
७. लाल किंवा हिरवी मिरची - १
८. मीठ - चवीनुसार
९. लिंबाचा रस - अर्धा चमचा
१०. साखर - अर्धा चमचा
११. तेल - १ चमचा
१२. हिंग - हळद - फोडणीपुरती
१३. कोथिंबीर - अर्धी वाटी

कृती -

१. सगळ्या डाळी स्वच्छ धुवून त्यात बसेल तेवढे पाणी घालून कुकरला शिजवायला लावाव्यात. साधारण ३ ते ४ शिट्ट्या घ्याव्यात.

२. झाकण पडल्यानंतर या डाळी चांगल्या हाटून घेऊन त्यामध्ये जवळपास दुप्पट पाणी घालावे.

३. यामध्ये साखर, मीठ, लिंबाचा रस घालून हे मिश्रण चांगले हाटून घ्यावे.

४. कढईमध्ये तेल घालून त्यामध्ये जीरे, हिंग, हळद घालावे. फोडणी तडतडली की त्यामध्ये मिरची, कडीपत्ता आणि लसणाच्या पाकळ्या घालाव्यात.

५. ही फोडणी डाळींच्या मिश्रणामध्ये घालून त्यावर वरुन कोथिंबीर घालावी. आवश्यकतेनुसार पाणी घालून हे मिश्रण गॅसवर पुन्हा चांगले उकळावे.

६. तूप घालून हे डाळींचे सूप गरमागरम प्यावे.

# आता खा मॅगी मंचूरियन!

मॅगीसोबत नेहमीच वेगवेगळे प्रयोग केले जातात. कधी मॅगीचं आईस्क्रिम बनवलं जातं तर कधी मॅगीचं सारण करून त्याचे सामोसे तळले जातात.

आता असाच एक मॅगीसोबत केलेला प्रयोग गाजतो आहे. या रेसिपीमध्ये मॅगीचे मन्चुरियन करून दाखवले आहेत. रेसिपी पाहून तर हा पदार्थ चवदार आणि खमंग असावा, असं वाटतं. काही जणांना हा प्रयोग आवडला आहे तर काही जणांनी असे प्रयोग करायला मॅगीचीच निवड का करता, म्हणून नाराजी व्यक्त केली आहे.



कसे करायचे मॅगी मन्चुरियन?

साहित्य

२ कप शिजवलेल्या नूडल्स
सिमला मिरची, गाजर, कांदा, कोबी अशा बारीक चिरलेल्या भाज्या २ कप
चायनिज सॉसेस
१ टीस्पून व्हिनेगर
मॅगी मसाला,आलं- लसूण-मिरचीची पेस्ट,मिरे पूड,तळण्यासाठी तेल,कॉर्नफ्लॉवर,चवीनुसार मीठ

रेसिपी

१. सगळ्यात आधी नूडल्स मसाला न टाकता शिजवून घ्या.

२. उकडलेल्या नूडल्स एका भांड्यात काढा. त्यात चिरलेल्या सगळ्या भाज्या आणि वरील पदार्थ घाला.

३. सगळं मिश्रण एकत्र करून व्यवस्थित कालवून घ्या आणि त्याचे लहान लहान गोळे बनवा.

४. कढईमध्ये तेल तापवून घ्या आणि त्यात मन्चुरियन तळून घ्या.

५. ग्रेव्ही तयार करण्यासाठी एका कढईमध्ये थोडं तेल घाला. तेल तापलं की त्यात कांदा आणि सिमला मिरचीचे चौकोनी आकाराचे काप टाकून परतून घ्या.

६. नंतर त्यात आलं- लसूण पेस्ट आणि टोमॅटो सॉस, चिली सॉस, शेजवान सॉस असे तुमच्या आवडीनुसार चायनीज सॉस घाला.

७. थोडं पाणी घाला आणि कॉर्नफ्लेवरची प्युरी टाकून तुम्हाला पाहिजे तसं ते घट्ट करून घ्या.

८. आता या ग्रेव्हीमध्ये तळलेले मन्चुरियन टाका. आणि गरमागरम मॅगी मन्चुरियन सर्व्ह करा.

# चष्म्याच्या काचेवर चरे पडतात, लवकर खराब होतो?

चष्मा ही आजकाल प्रत्येक घरात अगदी सहजतेने आढळून येणारी एक गरजेची वस्तू झाली आहे. शिवाय लहान मुलांनाही कमी वयातच चष्मा लागण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे प्रत्येक घरात चष्म्याचा नियमितपणे वापर करणारी एक तरी व्यक्ती नक्कीच आढळून येते.



चष्मा स्वच्छ करणं हे अशा सगळ्या मंडळींचं एक नित्याचं काम. पण वर्षानुवर्षे चष्मा वापरूनही नकळत काही चुका होऊन जातात आणि मग काचेवर चरे पडून चष्मा लवकरच खराब होऊन जातो. असं होऊ नये म्हणून चष्मा स्वच्छ करण्यासाठी (झ्रौशी शर्शिव ष लश्रशरपळपस ोशिलींरलश्रशी) या काही गोष्टी वापरून बघा..

चष्मा स्वच्छ करण्यासाठी...

१. चष्मा स्वच्छ करण्यासाठी कधीही कोरडा कपडा वापरू नका. तसेच कॉटन किंवा होजियरी सोडून इतर कोणत्याही कपड्याने चष्मा स्वच्छ करू नका. अर्थातच हे दोन्ही कपडेही ओलसरच असावेत.

६ कारणांमुळे हिवाळ्यात वारंवार होते सर्दी... फिट राहण्यासाठी बघा नेमकं काय करायचं

२. बेबी वाईप्स किंवा चेहरा पुसण्यासाठी वापरण्यात येणारे वेट वाईप्स वापरूनही चष्मा खूप चांगल्याप्रकारे स्वच्छ करता येतो.

३. रोज रात्री झोपताना जेव्हा चष्मा काढाल तेव्हा तो १५ ते २० सेकंदासाठी नळाखाली धरा. त्यानंतर तो न पुसता तसाच उभा ठेवून द्या. सकाळी ओलसर कपड्याने चष्मा पुसून घ्या. काचा स्वच्छ- चकचकीत होईल.

४. व्हाईट व्हिनेगर वापरूनही चष्मा स्वच्छ करता येतो. यासाठी एक वाटी पाणी घ्या. त्यात दोन टेबलस्पून व्हाईट व्हिनेगर टाका. हे मिश्रण व्यवस्थित हलवून एका स्प्रे बॉटलमध्ये भरून ठेवा. ते चष्म्यावर स्प्रे करून मग ओल्या कपड्याने पुसून घ्या.

# ट्राय करा पोहे पकोडे, बनवायला सोपे, चविष्ट - कुरकुरीत

नाश्ता म्हटलं की आपल्या डोक्यात आधी पोहे येतात. कांदे पोहे हे प्रत्येकाच्या घरात बनतात. घरातील सदस्य देखील चवीने आणि आवडीने खातात. मात्र, दररोज नाश्त्याला तेच तेच कांदे पोहे खाऊन कंटाळा आला असेल, तर पोहे पकोडे ट्राय करा.

आपल्याला चविष्ट, कुरकुरीत आणि रुचकर पदार्थ खाण्याची इच्छा होत असेल तर आजच पोहे पकोडे घरात बनवून पाहा. लहानग्यांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांना हा पदार्थ आवडेल. या हिवाळ्यात जर चमचमीत पकोडे खायचे असेल तर पोहे पकोड्यांचा उत्तम बेत आखा. आणि लहान मुलांचे मन खूश करा.



पोहे पकोडे बनवण्यासाठी लागणारे साहित्य :

पोहे दीड वाटी
उकडलेले बटाटे ३
२ हिरव्या मिरच्या
२ चमचे हिरवे धणे
अर्धा टीस्पून लाल तिखट
अर्धा टीस्पून जिरे
अर्धा टीस्पून साखर
एक टीस्पून लिंबाचा रस
एक टीस्पून तेल
मीठ

कृती

सर्वप्रथम पोहे स्वच्छ करा नंतर गाळणीत टाका आणि पाण्याने धुवा, आणि भिजत ठेवा. यानंतर एका बाऊलमध्ये बटाटे उकडून सोलून मॅश करून घ्या. त्यात हिरव्या मिरच्या आणि कोथिंबीर बारीक चिरून टाका. यासह भिजत घातलेले पोहे मिक्स करा.

या मिश्रणात लाल तिखट, जिरे, साखर, आणि इतर साहित्य घालून चांगले मिक्स करा. आता गॅसवर कढई ठेवा त्यात तेल टाकून गरम करा. तेल गरम झाल्यावर त्यात मिश्रणाचे लहान गोळे करून टाका आणि पकोड्यासारखे तळून घ्या.

कढईत पकोडे टाकल्यावर दोन्ही बाजूंनी सोनेरी होईपर्यंत तळून घ्या. आपण हे पकोडे सॉस किंवा हिरव्या चटणीसोबत गरमागरम सर्व्ह करू शकता.

# बंगळुरू येथे १८ पासून गारमेंट प्रदर्शन; १२ देशांतील व्यापारी राहणार उपस्थित

**सायं अपडेट प्रतिनिधी**

सोलापूर, दि. १४- यापूर्वी सात युनिफॉर्म गारमेंट प्रदर्शने यशस्वीरीत्या राबविल्यानंतर आता सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशनच्यावतीने आठवे आंतरराष्ट्रीय गारमेंट प्रदर्शन बंगळूरू येथे १८ डिसेंबरपासून तीन दिवस आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनासाठी विविध १२ देशांतील व्यापारी उपस्थित राहणार आहेत.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याचे प्रदर्शनाचे प्रमुख सुनील मेंगजी यांनी सांगितले. देशातीलच नव्हे तर जगातील एकमेव युनिफॉर्म सोर्सिंग हब बनण्याच्या उद्देशाने सोलापूर आपले लक्ष निर्धारित करीत आहे. उत्कृष्ट डिझाइन्स, दर्जेदार कापड व कुशल कामगारांच्या हस्ते हे युनिफॉर्म बनविले जातात आणि ते कमीत कमी खर्चात उपलब्ध करून दिले जातात. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष युनिफॉर्म गारमेंटकरिता सोलापूरकडे लागले असल्याचे मेंगजी यांनी सांगितले.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर या युनिफॉर्म प्रदर्शनाचे नाव झालेले आहे. या प्रदर्शनाला भेट देण्यासाठी घाना, सेनेगल, सर्बिया, केनिया, जॉर्डन, ड्यानमार्क, दुबई, घन्ना, नेपाळ, पश्चिम आफ्रिका, इस्रायल, मालदीव या देशातील व्यापारी येणार आहेत. स्कूल, कॉलेज, हॉस्पिटल, कॉर्पोरेट, रेल्वे कर्मचाऱ्यांचे युनिफॉर्म या प्रदर्शनाच्या माध्यमातून सोलापूरच्या उद्योजकांनी तयार केलेले आहेत. आतापर्यंत पार पडलेल्या प्रदर्शनाला केनिया, जॉर्डन, श्रीलंका, थायलंड अशा विविध देशातील उद्योजकांनी भेट देऊन युनिफॉर्मची कामे करून घेतलेली आहेत. अशा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रदर्शनास भेट देण्यासाठी आवश्य यावे, असे आवाहन गारमेंट असोसिएशनच्यावतीने करण्यात आलेले आहे.

# संविधान विटंबनाप्रकरणी आरोपीवर कारवाई करा

## शहर काँग्रेसची मागणी



**सायं अपडेट प्रतिनिधी**

सोलापूर, दि. १४- परभणी येथे संविधानाच्या प्रतिमेची विटंबना केल्याच्या घटनेचा निषेध करून काँग्रेसने यातील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भातील निवेदन सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख यांना दिले आहे.

परभणी शहरात एका माथेफिरूने संविधानाच्या प्रतिमेची विटंबना केली. या विरोधात लोकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. देशात व राज्यात भाजप सरकार सत्तेवर आल्यापासून जाती-जातीत, धर्मा-धर्मात भेद निर्माणाचे काम वाढले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाची घटना लिहिली, त्या घटनेची, संविधानाची सरकारकडून पायमल्ली होत आहे. संविधान बदलू असे म्हणणाऱ्यांनाही सरकार राजाश्रय देत आहे. परभणी येथील संविधान प्रतिकृतीच्या तोडफोडीची घटना ही निंदनीय आहे. याप्रकरणी राज्य सरकारने तत्काळ दखल घेऊन या घटनेतील मास्टरमाईंड कोण? याचा शोध घेऊन त्याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, ब्लॉक अध्यक्ष देवा गायकवाड, माजी नगरसेवक एन. के. क्षीरसागर, कार्याध्यक्ष हणमंतू सायबोळू, राहुल वर्धा, राजन कामत, तिरुपती परकीपंडला यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# कांद्याच्या नुकसानभरपाईपोटी शेतकऱ्यांना मिळणार ५८ कोटी



## माढा व बार्शीतील लाभार्थ्यांना दिलासा

**सायं अपडेट प्रतिनिधी**

सोलापूर, दि. १४- ऑक्टोबरमध्ये अतिवृष्टी होऊन कांदा पिकाचे नुकसान झालेल्या माढा व बार्शी तालुक्यातील सुमारे ३७ हजार शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी राज्य सरकारने ५८ कोटी रुपये मंजूर केले आहेत. लवकरच ही रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

सोलापूरसह राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये ऑक्टोबरमध्ये अतिवृष्टी झाली होती. त्यामध्ये कांदा, सोयाबीन आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. नुकसान झालेल्या पिकांचा पंचनामा करून कृषी विभागाने जिल्हा प्रशासनामार्फत राज्य सरकारकडे सादर केला होता. भरपाईची रक्कम मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासकीय स्तरावरून पाठपुरावा चालू होता. अखेर त्याला यश आले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने भरपाईची रक्कम मंजूर केली आहे.

माढा व बार्शी या दोन्ही तालुक्यातील सुमारे ४० हजार ३७६ हेक्टर क्षेत्रावरील कांदा व सोयाबीन पिकांचे नुकसान झाले होते. त्यामध्ये माढ्यातील १० हजार ७९३ शेतकऱ्यांसाठी १२ कोटी १५ लाख रुपये मंजूर झाले आहेत. तर बार्शी तालुक्यातील २६ हजार ९५४ शेतकऱ्यांना ४५ कोटी ८६ लाख रुपये भरपाईची रक्कम मिळणार आहे. १० डिसेंबर रोजी शासनाने भरपाईची ही रक्कम मंजूर केली असून शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर लवकरच नुकसान भरपाईची रक्कम जमा केली जाणार असल्याचे जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगितले.

# सुपर अर्बन सोसायटी तर्फे उद्या व्याख्यानाचे आयोजन

**सायं अपडेट प्रतिनिधी**


सोलापूर, दि. १४- येथील सुपर अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड सोलापूर व एशियन बिलासुदी फायनान्शियल सोसायटी सोलापूर यांच्या प्रधान कार्यालयाच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ रविवार, १५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता तेलंगी पाच्छा पेठ येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून 'व्याजमुक्त बँकिंग : स्वरुप आणि फायदे' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा नागरी सह. बँक असोसिएशनचे संचालक दिनकर देशमुख हे असणार आहेत. मुंबई येथील बैतुन नसरचे मो. सलीम काझी व माजी प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांचे वरील विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे. याप्रसंगी अ. जब्बार सगरे (लातूर), अ. रशीद शेख (बैतुल नसर, मुंबई), फारूख सय्यद (मुंबई), मुस्तफा कांचवाला (मुंबई), मुफ्ती अमजदअली काझी, मौलाना ताहेर बेग मोहम्मदी, मौलाना म. इब्राहिम कासमी, मौलाना हारिस इशाअती, डॉ. अखलाकअहमद वडवान, विलास कोरे, अ. जब्बार इंगळगी, मलंग शेख, फैज इनामदार हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. व्याजमुक्त बँकिंग ही पारंपरिक बँकिंग प्रणालीला एक पर्याय असून नैतिकता, सामाजिक समता आणि आर्थिक स्थिरतेवर आधारित आहे. जर योग्य प्रकारे लागू केली गेली तर, ही प्रणाली आर्थिक सुधारणांचा एक नवा अध्याय उघडू शकते. व्याज मुक्त बँकिंग ही एक वित्तीय प्रणाली आहे. ज्यामध्ये बँका किंवा वित्तीय संस्था कोणत्याही प्रकारच्या व्याजाची देणगी घेत किंवा देत नाहीत. ही प्रणाली इस्लामिक बँकिंगच्या तत्त्वांवर आधारित असून आर्थिक व्यवहार धर्मनिरपेक्ष नैतिकतेच्या आधारावर चालविली जाते. या प्रणालीचा फायदा गोरगरीब जनता व छोट्या व्यावसायिकांना जास्त होणार असून नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून बिलासुदी सोसायटीबाबत माहिती घेऊन त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे चेअरमन आसिफ इक्बाल यांनी केले आहे.

# सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या

**सायं अपडेट प्रतिनिधी**

सोलापूर, दि. १४- मस्साजोग (जि. बीड) येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अमानुषपणे हत्या करण्यात आली. या घटनेतील आरोपींना तत्काळ अटक करून हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत. सरकारने ही घटना योग्य पध्दतीने हाताळली नाही तर रस्त्यावर उतरून आंदोलन करू, असा इशारा सकल मराठा समाजाचे समन्वयक माउली पवार यांनी दिला. दरम्यान, या घटनेचा निकाल लागेपर्यंत धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांना मंत्रिमंडळात घेऊ नका, अशी मागणी यावेळी पवार यांनी केली.



सरपंच देशमुख यांच्या हत्येप्रकरणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना निवेदन देऊन सकल मराठा समाजाने या घटनेचा निषेध नोंदविला आहे. गुन्हेगारांवर प्रशासन व पोलिसांचा वचक राहिला नाही. सरकारी यंत्रणा व पोलीस गुन्हेगारांच्या हातचे बाहुले झाले आहेत. ही परिस्थिती अशीच राहिली तर भविष्यामध्ये याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मस्साजोग येथे घडलेल्या घटनेची सखोल चौकशी करण्यात यावी, त्यातील दोषींवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी, हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, आरोपींना फाशीची शिक्षा होण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी राजन जाधव, शिवराम गायकवाड, शिवाजी चापले, रणजितसिंह कदम-पाटील उपस्थित होते.

# ध्वजनिधी संकलनाचा गुरूवारी शुभारंभ

**सायं अपडेट प्रतिनिधी**

सोलापूर, दि. १४- जिल्ह्याचा सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम गुरूवार, १९ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

यावेळी ध्वजदिन-२०२३ निधी संकलनात उत्कृष्ट संकलन केलेल्या कार्यालयांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम महापालिका आयुक्त शीतल तेली उगले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमास शासकीय, निमशासकीय कार्यालयांचे प्रमुख, माजी सैनिक, वीर माता, पिता, वीरपत्नी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी केले आहे.

# सोलापूर-सिकंदराबाद इंटरसिटी सुरू करा

## चेंबर ऑफ कॉमर्सची मागणी

**सायं अपडेट प्रतिनिधी**

.सोलापूर, दि. १४- नागरिक, व्यापारी, उद्योजक व भाविकांच्या सोयीसाठी सोलापूर-सिकंदराबाद इंटरसिटी रेल्वेगाडी सुरू करा, यासह इतर विविध मागण्यांचे निवेदन सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्यावतीने मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक धरमवीर मीना यांच्याकडे करण्यात आली.

मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक मीना हे शुक्रवारी सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्यावतीने रेल्वे स्थानकावरील आवश्यक सुविधा आणि प्रवाशांच्या सोयीसाठी वाढीव गाड्यांची मागणी करणारे निवेदन देऊन मीना यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी चेंबरचे अध्यक्ष राजू राठी, सचिव धवल शहा, प्रवक्ते पशुपती माशाळ, ज्येष्ठ संचालक सुकुमार चंकेश्वरा, शैलेश बच्चुवार, संजय कंदले, दयासागर सालुटगी, व्यवस्थापक गिरिश बिंगी उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिकांना तिकीटदरामध्ये मिळणारी सवलत कोरोना लॉकडाउनपासून बंद झाली आहे. ती पुन्हा सुरू करावी, वंदे भारत सेमी सुपरफास्ट एक्स्प्रेसच्या मुंबई ते सोलापूर वेळेत बदल करावा, ही गाडी सायंकाळी ६ वाजल्यानंतर सोडावी, सोलापूर- नागपूर- विलासपूर- रायपूर (छत्तीसगढ) एक्स्प्रेस सुरू करावी, सोलापूर-हावडा (कोलकाता) एक्स्प्रेस सुरु करावी, बंद असलेली किसान रेल पूर्ववत सुरु करावी, यामुळे शेतकरी, आडते, व्यापारी वर्गाची मोठ्या प्रमाणात सोय होणार आहे. सोलापूर- पुणे- सोलापूर करिता सायंकाळी ४ ते ५ या वेळेत नवीन इंटरसिटी एक्स्प्रेस सुरू करावी आदी मागण्यांचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. यावेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरजकुमार दोहरे, शैलेश परिहार, स्टेशन मास्तर सी. एल. मीना व ताजोद्दीन, लोहकरे आदी अधिकारी उपस्थित होते. तसेच सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, सचिव धवल शहा, पी.आर.ओ. पशुपती माशाळ, संचालक सुकुमार चंकेश्वरा, शैलेश बच्चुवार, संजय कंदले व दयासागर सालुटगी, आदी उपस्थित होते.

solapur अपडेट
दैनिक सायं अपडेट

# प्रयागराज येथील कुंभमेळ्यासाठी १० हजार ताटे व पिशव्या देणार

**सायं अपडेट प्रतिनिधी**

अक्कलकोट, दि. १४- उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये १४४ वर्षांनी होणाऱ्या महाकुंभमेळ्याला सुमारे शंभर देशांतून ४० कोटींहून अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. मात्र, या भाविकांना जेवण देताना प्लास्टिक व थर्माकोलच्या ताटांचा वापर होणार असल्याने दररोज १ हजार २०० टन कचरा निर्माण होणार आहे. म्हणून अक्कलकोट शहर तालुक्यातून 'एक थाली, एक थैली' या उपक्रमानुसार १० हजार स्टील ताटे व कापडी पिशव्यांचे नियोजन केले असल्याची माहिती अक्कलकोट पर्यावरण धार्मिक गतिविधीचे प्रमुख महेश वागदरी यांनी दिली.

प्रयागराज येथे मकरसंक्रांतीपासून ते महाशिवरात्रीपर्यंत महाकुंभमेळा होणार आहे. या कुंभमेळ्याच्या वेळी होणारा प्लास्टिक कचरा टाळण्यासाठी आणि कचऱ्यापासून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी थाळी व पिशवी देण्याचा स्तुत्य उपक्रम सध्या सर्वत्र देशभरात राबविण्यात येत आहे. दरम्यान, या ठिकाणी विविध संस्था, संघटनांकडून मोफत भोजनाची व्यवस्था केली जाते. मात्र, जेवण देताना प्लास्टिक व थर्माकोलच्या ताटांचा वापर होणार आहे. म्हणून या उपक्रमांतर्गत अक्कलकोट येथील निसर्गप्रेमी युवकांचा मोठा सहभाग असून शहर आणि तालुक्यातील हजारो लोक या उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद देत असल्याची माहिती सुशील हिरस्कर यांनी दिली.

बहुतेक ठिकाणी जेवणावळींसाठी आतापर्यंत प्लास्टिक, थर्माकोलच्या पत्रावळी वापरून फेकून दिल्या जातात. यामुळे मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, थर्माकोलचा कचरा होतो. मात्र, अशा प्रकारचा प्लास्टिक, थर्माकोलच्या पत्रावळींचा कचरा पर्यावरणासाठी घातक ठरू नये, यासाठी पश्चिम महाराष्ट्रात पूर्ण इको व्हिजन या संस्थेतर्फे 'एक थाळी, एक थैली' हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत कुंभमेळ्यात रोजच्या जेवणासाठी आतापर्यंत स्टीलची तब्बल ५० हजार ताटे संकलित झाली असल्याची माहिती पश्चिम महाराष्ट्र प्रांत वृक्षयान सहप्रमुख प्रवीण तळे यांनी दिली.

**२० डिसेंबरपर्यंत देणगीचे आवाहन**

या कुंभ मेळ्यासाठी जगभरातून सुमारे १०० देशांतून ४० कोटींपेक्षा जास्त भाविक प्रयागराज येथे दाखल होणार आहेत. एक थाळी व एक पिशवी खरेदीसाठी १२५ इतका खर्च येतो. त्यामुळे १२५ रुपयांच्या पटीत आपण कितीही देणगी देऊ शकता. आतापर्यंत अक्कलकोटमधून हजारो भाविकांनी देणगी दिली आहे. येत्या २० डिसेंबर २०२४ पर्यंत इच्छुक नागरिकांना या उपक्रमासाठी देणगी देण्याचे आवाहन संयोजक तथा निसर्ग सेवा फाउंडेशनचे प्रमुख सुनील बिराजदार यांनी केले आहे.

# स्वामी भक्तांच्या सोयीसाठी अक्कलकोट-वास्को बस सेवा




**सायं अपडेट प्रतिनिधी**

अक्कलकोट, दि. १४- येथे श्री समर्थांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी गोवा राज्य परिवहन महामंडळाने अक्कलकोटसाठी एसटी बसची सेवा सुरू केल्याने भाविकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

अक्कलकोट ते वास्को या गोवा राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (कदंबा) बसचे पूजन शुक्रवारी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

स्वामी भक्तांसाठी बस सुरू करण्यासाठी गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, परिवहनमंत्री मोहीन बुदीनो, गोवा राज्य परिवहन महामंडळ (कदंबा) ट्रान्स्पोर्टचे अध्यक्ष उल्हास तुयेकर यांच्याकडे न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, अमोल कालिदास कोळी, नीलेश पेडणेकर यांनी पाठपुरावा केला होता. गोव्याकडे मार्गस्थ होणाऱ्या एसटी बसच्या पूजनप्रसंगी सहायक वाहतूक अधिकारी सुहेश सावंत, चालक मल्लिकार्जुन शिंदे, महेंद्र हजेरी, वाहक रफिक पटेल यांच्यासह न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव श्यामराव मोरे, भारत पाटील, ओंकारेश्वर उटगे उपस्थित होते.

सदर एसटी बस वास्कोवरून दररोज सायंकाळी सात वाजता सुटणार असून दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसात वाजता पोहोचेल. अक्कलकोटहून सायंकाळी ६.१५ वाजता सुटणार ती वास्कोला दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसातला पोहोचणार आहे. ही बस पणजी, पत्रादेवी, बांधा, म्हापसा, कुडाळ, कणकवली, सांगली, मिरज, कोल्हापूर, पंढरपूरमार्गे सोलापूर, अक्कलकोटला पोहोचणार आहे.

# पंचाचार्य ध्वजारोहणाने धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ

**सायं अपडेट प्रतिनिधी**

सोलापूर, दि. १४- होटगी मठाचे तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पुण्याराधनानिमित्त शुक्रवारी होटगी (ता. दक्षिण सोलापूर) येथील मठामध्ये गंगा-गणपतीचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर काशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते श्री जगद्गुरू पंचाचार्य ध्वजारोहण करून विविध धार्मिक कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. विश्वाराध्य शिवाचार्य स्वामीजी, श्रीकंठ शिवाचार्य स्वामीजी, नीलकंठ शिवाचार्य स्वामीजी, अमृतेश्वर शिवाचार्य स्वामीजी, अभिनव रुद्रमिनी शिवाचार्य स्वामीजी, वैदिकवृंद, संस्थेचे सचिव, संचालक, पदाधिकारी, समस्त भक्तगण उपस्थित होते. विविध धार्मिक कार्यक्रमांची रूपरेषा श्रीकंठ शिवाचार्य स्वामीजी यांनी प्रास्तविकातून सांगितली. याप्रसंगी मागणगेरीचे विश्वाराध्य शिवाचार्य स्वामीजी यांनी मनोगतात तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर काशीजगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींनी धार्मिक कार्यक्रमाची सुरुवात वीरशैव धर्ममध्ये पंचाचार्य ध्वजारोहणानेच केली जाते, असे सांगून पंचपीठ पंच रंगाची माहिती सविस्तरपणे सांगितली. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होते.



# अनेक अनुष्ठान, पारायणानंतर वैरागमध्ये स्थापन झाले नृसिंह सरस्वती स्वामीचे मंदिर

## वयाच्या ९० वर्षीही केसकर यांची अखंड सेवा

**सायं अपडेट प्रतिनिधी**

वैराग, दि. १४- दत्तप्रभूंचे तिसरे अवतार श्री नृसिंह सरस्वती महाराजांचे मंदिर वैराग (ता. बार्शी) येथे आहे. कालिदास केसकर यांनी वयाच्या आठव्या वर्षापासून दत्तप्रभूंची उपासना सुरू केली. आज ते ९० वर्षांचे असले तरी तीच भक्ती-सेवा अखंड आहे.

रानातील वस्तीजवळ औदुंबर वृक्ष होता. त्याजवळ गायत्री व हनुमान मंदिर स्थापन केले. त्यांची उपासना सुरु होती. अचानक, तो वृक्ष वठला. याबाबतची विचारपूस करण्यासाठी ते गुरुनाथबाबा दंडवते महाराज यांच्याकडे आले. त्यांनी उपासनेची आज्ञा केली. दंडवते महाराजही पूर्वी त्या ठिकाणी आले होते. मामासाहेब देशपांडे या गुरुंच्या आशीर्वादाने त्यांनी औदुंबर व पुणे येथे त्यांनी गायत्री पुनश्चरण केले. देवाच्या कृपेने १० ते १२ वर्षांनंतर शेतातील वठलेला औदुंबर पुन्हा बहरला. त्यानंतर केसकर यांनी त्या ठिकाणी पाच प्रदीर्घ अनुष्ठान केले. दंडवते महाराज व देशपांडे यांच्या आशीर्वादाने नृसिंह सरस्वती महाराज मंदिराची उभारणी झाली. गावकरी, भाविकांच्या पुढाकारातून २००९ मध्ये मंदिर उभारणी पूर्ण झाली.

# ग्रंथालयांच्या ४० टक्के अनुदान वाढीचा निर्णय घ्या

## महेश कुलकर्णींची अजितदादांकडे मागणी

**सायं अपडेट प्रतिनिधी**

सोलापूर, दि. १४- राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या ४० टक्के अनुदान वाढीचा निर्णय तातडीने घेऊन ग्रंथालय कर्मचाऱ्यांना दिलासा देण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव महेश कुलकर्णी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कुलकर्णी यांनी पवार यांची मुंबईत भेट घेऊन उपमुख्यमंत्रिपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार केला. त्यानंतर त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन अजित पवार यांच्याकडे देऊन ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना साकडे घातले. राज्यात ११ हजार शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. या ग्रंथालयांमध्ये जवळपास २० हजार कर्मचारी तुटपुंज्या मानधनावर काम करीत असून त्यांच्या कुटुंबाची उपजीविका भागविण्या इतपतसुध्दा त्यांना मानधन मिळत नाही.

आर्थिक परिस्थिती बिकट असूनही अशा परिस्थितीत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांतील २० हजार कर्मचारी ग्रंथालयामध्ये काम करत आहेत. त्यामुळे ग्रंथालयांचे अनुदान वाढ करून दर्जा बदल, नवीन ग्रंथालयास मान्यता देणे व केंद्र शासनाचा निधी प्रत्येक ग्रंथालयास देण्यासंदर्भाच्या प्रस्तावासही मंजुरी मिळावी. तसेच राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाचे ४० टक्के अनुदान वाढीचा निर्णय तातडीने घेण्यात यावा, याबाबत कुलकर्णी यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी सविस्तर चर्चा केली.यावेळी शरद येचे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याक दिवस

**सायं अपडेट प्रतिनिधी**

सोलापूर, दि. १४- अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणीव करुन देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्यावतीने बुधवार, १८ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजता जिल्हा नियोजन समिती कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस आयोजित करण्यात आल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी दिलीप पवार यांनी दिली.

अल्पसंख्याक समाजातील नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे, यासाठी १८ डिसेंबर हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याबाबत राज्य शासनाचे निर्देश आहेत. त्या अनुषंगाने सदर दिवशी जिल्हा नियोजन समितीमार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे जिल्हा नियोजन अधिकारी पवार यांनी सांगितले.

# श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानतर्फे उद्या वधू-वर परिचय मेळावा

**सायं अपडेट प्रतिनिधी**

कोरवली, दि. १४- श्री गुरु.ष.ब्र. तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी बृहन्मठ होटगी यांची पुण्यतिथी व सुरेश वाले यांच्या वाढदिवसानिमित्त वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातींचा राज्यस्तरीय मोफत वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

हा मेळावा मोहोळ तालुक्यातील कोरवली येथील आमोगसिध्द प्रशालेत रविवार, १५ डिसेंबर रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत होणार आहे. या कार्यक्रमास विजयमहांत शिवाचार्य महास्वामीजी, हवीनाळ यांचे दिव्य सान्निध्य लाभणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत दामाजी कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील हे राहणार आहेत. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात सुधीर थोबडे, उदयशंकर पाटील, महेश थोबडे, श्रीशैल वाले, श्रीकांत शिवपुजे, महानंदाताई आंडगे, राजशेखर पाटील आदी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. याच कार्यक्रमात नागराज मजगे डीवायएसपी, संतोष खुबा रक्ताच्या आजाराविषयी तज्ज्ञ, राजकुमार मंठाळे संस्थापक बसवेश्वर बहुउद्देशीय संस्था, बिपिन करजोळे राष्ट्रवादी श.प.ग.तालुकाध्यक्ष यांना विशेष पुरस्कार देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रामचंद्र आलुरे, कैलास तोडकरी, बसवराज पाटील, गौरीशंकर बुरकुल, संतोष मोगले, सुरेश शिवपुजे, पप्पू स्वामी, काशीनाथ पाटील, मल्लिनाथ बचाटे, नागराज पाटील, राजकुमार घोंगडे, किरण पाटील, महेश भोरे, संतोष वायचळ, भीमाशंकर कुर्डे असे अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या मोफत राज्यस्तरीय लिंगायत वधू-वर सूचक मेळाव्यात लग्नाला इच्छुक असणाऱ्या तरुण-तरुणी व त्यांच्या पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सुरेश वाले यांनी केले.